

Dissemination of Education for Knowledge, Science and Culture
-Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

**Vivekanand College, Kolhapur**

**(Empowered Autonomous)**

# Department of History

## Surprise Test

## NOTICE

Date :17/02/2025

The students of M.A. Part-1 in the History Department of Vivekananda College are informed that Surprise Test on Chapter 3 -Social Dr. Babasaheb Ambedkar of the subject "History of Social Reformers in Maharashtra" will be conducted on Tuesday, 25th February, 2025. The test will take place from 12:15 to 1:15 in Room Number 214. All students are requested to be present on time with their preparation and necessary reference materials for the test.

Dr. S. R. Kattimani

HEAD
DEPARTMENT OF HISTORY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (EMPOWERD AUTONOMOUS)

M.A - I, Semester - II

**CONTINUOUS INTERNAL EXAMINATION**

Subject – History

Title- History of Social Reformers in Maharashtra- Paper No - 7

Subject Code -

| | |
|---|---|
| Date: | 25th February, 2025 |
| Total Marks: | 15 |
| Type of Test: | Surprise Test |
| Additional Info: | |
| Module: | 3 |
| Que. Describe Life and Work of Dr. Babasaheb Ambedkar. | |



Dissemination of Education for Knowledge, Science and Culture.

-Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

**Vivekanand College, Kolhapur**

**(Empowered Autonomous)**

(स्वायत्त) कोल्हापूर

# Department of History

## History of Social Reformers in Maharashtra-Surprise Test- Report

Date: 26/02/2025

The students of M.A. Part-I in the History Department of Vivekananda College had Surprise test on the paper "History of Social Reformers in Maharashtra" on Tuesday, 25th February, 2025. There were 14 students present at this time. The Surprise test helped the students reduce their fear of exams.

It was seen that the students used many reference tools and the internet to obtain information for this test. It also helped increase the students' knowledge of the subject and boost their confidence.

Dr. S. R. Kattimani

HEAD
DEPARTMENT OF HISTORY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

|| ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ||

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

(अधिकारप्रदत्त स्वायत्त)
कोल्हापूर

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.

(Empowered Autonomous)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | [signature] |
| Students Sign. : | |
| Seat No. : | 14/15 |
| Seat No. in words : | |
| Suppliment No. : | 17220 |
| Centre | |

प्र. क्र.
Q. No.

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

नाव : गौरी विकास चव्हाण.

इयत्ता : एम. ए. भाग – 1

ह. क्रमांक : 7003

विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन व कार्य.

| 02 | Section | Q. No. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks | | | | | | | | | | | |

प्र. क्र.
Q. No.

• डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन व कार्याची सविस्तर माहिती लिहा.

## प्रस्तावना :

आधुनिक महाराष्ट्राच्या समाज सुधारणेच्या चळवळीमध्ये सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळी प्रमाणेच दलित चळवळीला महत्त्वाचे स्थान आहे. हिंदू समाजाने बहिष्कृत आणि तिरस्कृत ठेवलेल्या जातींना दलित म्हटले जाते. दलित हा शब्द सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करतो.

## (1) जन्म व पूर्व वृत्तांत :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी मध्य प्रदेश मधील 'महू' येथे एका गरीब दलित कुटुंबात झाला होता. त्यांचे पूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर असे होते. रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबवडे हे त्यांचे मूळ गाव. वडील 'रामजी' सैन्यात सुभेदार असल्याने शिक्षण व शिस्त लहानपणापासून

त्यांच्या आईचे नाव भीमाबाई होते. त्यांची आई भीमाबाई लहानपणीच वारल्याने त्यांच्या वडीलांनी त्यांचे पालन पोषण केले व चांगले संस्कार त्यांच्यावर व्हावेत म्हणून ते दक्ष असत.

② **शिक्षण :** -

बाबासाहेबांचे वडील रामजी आंबेडकर सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर त्यांना सातारा येथे दुसरी सरकारी नोकरी मिळाली. त्यामुळे बाबासाहेबांचे बालपण सातारा येथे गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण सातारा व मुंबई या ठिकाणी झाले. १९०७ साली ते मॅट्रिक ची परिक्षा पास झाले.

• **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य** -

आंबेडकरांना बालपणापासून शिक्षण घेताना सामाजिक ठिकाणी व बडोदा संस्थानामध्ये नोकरी करत असताना परदेशी शिक्षणानंतर अस्पृश्यता अनुभवली. त्यामुळे भारतातील सामाजिक विषमतेची आंबेडकरांना चीड निर्माण झाली होती.

| 04 Section | Q. No. | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

## (1) माणगाव अस्पृश्यता निवारण परिषद

नागपूर व कोल्हापुरातील माणगाव येथे भरलेल्या अस्पृश्यता निवारण परिषदांमध्ये राजर्षी शाहू महाराजांनी आंबेडकरांविषयी गौरवोद्गार काढताना म्हटले की, "माझ्या राज्यातील बहिष्कृत प्रजाजनांनो, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला याबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की डॉ. आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत."

## (2) बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना

इंग्लंडमधून भारतात परतल्यावर बाबासाहेबांनी पुन्हा एकदा आपल्या सार्वजनिक कार्याला नव्या जोमाने सुरुवात केली. अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करून त्यांना अस्पृश्यतेच्या प्रथेविरुद्ध संघर्ष करण्यास प्रवृत्त करण्यासाठी 20 जुलै, 1924 रोजी बाबासाहेबांनी "बहिष्कृत हितकारिणी सभेची" स्थापना केली. याशिवाय या सभेची स्थापना करून शाळा, ग्रंथालय व वसतिगृह सुरू करण्याचे काम या संघटनेने केले.

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ॥

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

(श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर)

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.

(Empowered Autonomous)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | |
| Students Sign. : | |
| Seat No. : | |
| Seat No. in words : | |
| Suppliment No. : | |
| | 17219 |
| Centre | |

प. क्र. / No.

③ <u>महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह</u> :

बाबासाहेबांची 1927 मध्ये मुंबई प्रांताच्या कायदेमंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती केली. सरकारने 1926 मध्ये कायदा करून सार्वजनिक पाणवठ्यांच्या जागा सर्वांसाठी खुल्या केल्या. परंतु याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नव्हती. महाड येथील चवदार तळ्याचे पाणी भरण्यास अस्पृश्यांना मज्जाव केला होता.

④ <u>मनुस्मृतीचे दहन</u> :

महाड येथे भरलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या सत्याग्रह परिषद; सनातनी हिंदू समाजाचा धर्मग्रंथ असलेल्या मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय घेतला होता. मनुस्मृतीने जन्माधिष्ठित वर्ण व्यवस्थेचे समर्थन करून सामाजिक विषमतेला व त्यावर आधारित जातिव्यवस्थेला आधार प्राप्त करून दिला होता.

| 02 | Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks | | | | | | | | | | | | |

⑤ मंदिर प्रवेशाची चळवळ :

हिंदु धर्मातील उच्चवर्णीयांनी अस्पृश्यांना मंदिर प्रवेशाचा हक्क मिळाला आहे तितकाच ती अस्पृश्यांचीही आहे. म्हणून मंदिर प्रवेशाचा आमचा हक्क मान्य झालाच पाहिजे. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मंदिरे बांधणे हा अस्पृश्यता निवारण्याचा मार्ग नाही. तर सवर्णांनी व्यवस्था सर्वांसाठी खुल्या करून अस्पृश्यता निवारण करता येईल. या प्रसंगी सत्याग्रहींना सवर्णीयांनी मारहाण केली.

⑥ बौद्ध धर्माचा स्वीकार :

हिंदु समाजातील सामाजिक विषमता नष्ट व्हावी व अस्पृश्यांना आपले समान अधिकार प्राप्त व्हावेत तसेच चळवळीद्वारे अस्पृश्यांना न्याय मिळावा यासाठी बाबासाहेबांनी प्रयत्न केले. परंतु तरीही सवर्ण हिंदुच्या वर्तनामध्ये फारसा फरक पडला नाही. आंदोलकांना या चळवळीत केवळ श्रम, काळ व धन वाया गेल्याची जाणीव झाली.

| Q. No. | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | | | | | | 03 |

## (७) राजकीय कार्य :

अस्पृश्यांना राजकीय हक्क संपादित करावेत आणि त्यांना राजकारणात स्वतःचा आवाज प्राप्त करून देण्यात आंबेडकरांनी सिंहाचा वाटा उचलला होता. परंतु बाबासाहेबांना केवळ अस्पृश्यांचे नेते समजणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणारे आणि आपल्या अज्ञानाचे प्रदर्शन ठरेल. राजकीय क्षेत्रात त्यांनी देशासाठी केलेले कार्य खूप महत्त्वाचे आहे. त्यांचे राजकीय विचार देशाच्या दृष्टीने आजही उपयुक्त आहेत.

## (८) पुणे करार :

अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची निर्मिती करण्यास महात्मा गांधींचा विरोध होता. अस्पृश्यांना हिंदू पासून वेगळे करण्याचा हा ब्रिटिशांचा डाव आहे असे त्यांचे म्हणणे होते. अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाला मान्यता दिली तर ते इतर हिंदू समाजापासून दूर जातील म्हणून जातीय निवाड्याच्या या तरतुदी विरोधात महात्मा गांधींनी पुणे येथील येरवडा तुरुंगात प्राणांतिक उपोषण सुरू केले.

| Section | Q. No. | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | | |

क्र. No.

⑨ स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना : 1936

1935 च्या भारत सुधारणा कायद्यान्वये 1937 मध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार होत्या. त्या संधीचा लाभ घेवून अस्पृश्यांचा लढा अधिक गतीमान करण्यासाठी 16 ऑगस्ट 1936 रोजी बाबासाहेबांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला. या पक्षाने 1937 च्या निवडणुकीत 13 जागा जिंकल्या. बाबासाहेब भायखळा मुंबई या राखीव जागेवर निवडून आले.

⑩ शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना:

अस्पृश्य व दलितांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी व न्याय मिळवून देण्यासाठी देश पातळीवर एक स्वतंत्र पक्ष असावा या हेतूने रावबहादूर एन. शिवराज सहकाऱ्यांच्या समवेत बाबासाहेबांनी "अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची" स्थापना 1942 मध्ये केली. या पक्षाची 31 कलमी घटना बाबासाहेबांनी स्वतः तयार केली. आंबेडकरांनी 1942 ते 1946 या काळात व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात मजूर मंत्री म्हणून काम पाहिले.

14

|| ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ||
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

नाव - आदित्य मच्छिंद्र कुंभार
Seat No. - 121613[illegible]2
M.A. (History) Sem II
2025

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.
(Empowered Autonomous)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | [signature] |
| Students Sign. : | |
| Seat No. : | |
| Seat No. in words : | |
| Suppliment No. : | 11/15 |
| | 17297 |
| Centre | |

प्र. क्र. / Q. No.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्याची माहिती थोडक्यात स्पष्ट करा.

→ आधुनिक महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या चळवळीमध्ये सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळी प्रमाणेच दलित चळवळीला महत्त्वाचे स्थान आहे. हिंदू समाजाने बहिष्कृत आणि तिरस्कृत ठेवलेल्या जातींना दलित म्हणतले जाते. दलित हा शब्द सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करतो. दलितांमध्ये स्वाभिमान, आत्मविश्वास निर्माण करून त्यांना संघटित करण्याचे व न्याय हक्कासाठी त्यांना संघर्ष करण्यास तयार करण्याचे कार्य दलित चळवळीने केले. दलित चळवळ ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्वीच्या काळात सुरू झाली असली तरी तिला चळवळीचे स्वरूप खरा अर्थाने डॉ. आंबेडकरांनी दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना अत्याचार व गुलामगिरीतून मुक्त करण्याबरोबरच भारतीय घटनेनुसार त्यांना आर्थिक विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे अलौकिक कार्य केले. म्हणूनच भारतीय घटनेचे शिल्पकार व कोट्यवधी दलितांच्या जीवनाचे उद्धारक म्हणून यांचे कार्य वेगळे व असामान्य आहे.

* जन्म व शिक्षण :-

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेश मधील 'महू' येथे एका गरीब दलित कुटुंबात झाला.
- यांचे पूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर असे होते.
- रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबवडे हे यांचे मूळ गाव.

प्र. क्र. Q. No.

- वडील 'रामजी' सैन्यात सुभेदार असल्याने शिक्षण व शिस्त लहानपणा-पासून यांच्या अंगी बाणली होती.
- यांची आई भीमाबाई लहानपणी वारल्यानेच यांच्या वडिलांनी त्यांचे पालन पोषण केले व यांच्यावर चांगले संस्कार घातले. म्हणून ते दक्ष असत.
- यांना वाचनाची आवड असल्यामुळे घरात ग्रंथ संग्रह होताच मुलांनाही ते चांगली पुस्तके आणून देत असत.
- बाबासाहेबांच्या आयुष्याची अंतिम क्षणांपर्यंत वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय यांच्या ठाई आढळते.
- बाबासाहेबांचे वडील रामजी आंबेडकर सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर यांना सातारा येथे दुसरी सरकारी नोकरी मिळाली.
- यामुळे बाबासाहेबांचे बालपण सातारा येथे गेले. यांचे माध्यमिक शिक्षण सातारा व मुंबई या ठिकाणी झाले.
- 1907 मध्ये ते इंग्रजी व पर्शियन विषय घेऊन बी.ए ची परिक्षा उत्तीर्ण झाले.
- त्यानंतर परदेशी शिक्षणासाठी यांना महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या तर्फे शिष्यवृत्ती दिली गेली.
- यांनी अर्थशास्त्र विषयात एम.ए ची पदवी 1915 साली संपादन केली.
- 1916 मध्ये कोलंबिया विद्यापीठातच पी.एच.डी साठी यांनी ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेचा विकास या विषयावर प्रबंध लिहिला.
- 1923 मध्ये बॅरिस्टरची परिक्षा पास होऊन ते भारतात परतले.

* सामाजिक कार्य :-

- आंबेडकरांना बालपणापासून शिक्षण घेताना सार्वजनिक ठिकाणी व बडोदा संस्थानामध्ये नोकरी करत असताना पदोपदी अपमानास्पद वागणूक मिळाली.

| Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | 03 |

प्र. क्र. Q. No.

- त्यामुळे भारतातील सामाजिक विषमतेबद्दल आंबेडकरांना चीड निर्माण झाली होती.
- आंबेडकरांच्यामते "ज्या प्रमाणे कोणत्याही राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याचा अधिकार नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही एक विशिष्ट वर्गाला दुसऱ्या वर्गावर अधिसत्ता गाजविण्याचा अधिकार नाही'.
- म्हणूनच आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात करताना त्यांनी अस्पृश्यांना त्यांचे नैसर्गिक हक्क व न्याय मिळवून देण्याच्या कार्याला प्रारंभ केला.
- दलित मुक्ती लढ्यांद्वारे बहुजनांमध्ये अस्मिता, बळ, सामाजिक विषमतेबद्दलची चीड निर्माण करण्याचे काम आंबेडकरांनी केले.
- शाहू महाराजांनी दिलेल्या आर्थिक मदतीच्या सहाय्याने बाबासाहेबांनी 1920 मध्ये मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. व सामाजिक विषमतेवर प्रखर टिका केली.

* माणगाव अस्पृश्य निवारण परिषद :

- नागपूर माणगाव येथे आयोजित अस्पृश्यता निवारण परिषदांमध्ये आंबेडकर सहभागी झाले होते.
- 22 मार्च 1920 रोजी माणगाव येथील परिषदेमध्ये राजर्षी शाहू महाराजांनी आंबेडकरांविषयी गौरवोद्गार काढताना म्हणाले की "माझ्या राज्यातील बहिष्कृत प्रजाजनांनी, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला. याबद्दल मी तुमचे अंतकरणपूर्वक अभिनंदन करतो.
- माझी खात्री आहे की, डा. आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत.
- शाहु महाराजांची भविष्यवाणी ही तंतोतंत खरी ठरली.

* महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह :-

- सरकारने 1926 मध्ये कायदा करून सार्वजनिक पाणवठ्यांच्या जागा

| 04 | Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks | | | | | | | | | | | | |

प्र. क्र.
Q. No.

सर्वांसाठी खुला केला
- परंतु याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नाही.
- महाड येथील चवदार तळ्याचे पाणी भरण्यास अस्पृश्यांना मज्जाव केला होता
- बाबासाहेबांनी स्वतः चवदार तळ्याजवळ जाऊन पाणी पिण्याचे ठरवले. त्यानुसार २० मार्च १९२७ रोजी हजारो अनुयायांसह चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले.

★ मनुस्मृतीचे दहन :-

- महाड येथे भरलेल्या बहिष्कृत हितकारणी सभेच्या सत्याग्रह परिषदेत सनातनी हिंदू समाजाच्या धर्म ग्रंथ असलेल्या मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय घेतला होता.
- मनुस्मृतीत जन्माधिष्ठीत वर्ण अवस्थेचे समर्थन करुन सामाजिक विषमतेला व त्यावर आधारित जातीव्यवस्थेला आधार प्राप्त करुन दिला होता.
- याचा निषेध करण्यासाठी बाबासाहेबांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे जाहिररित्या दहन केले.

★ भारतीय घटनेचे शिल्पकार :-

- डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशासाठी केलेली अत्यंत महत्वपूर्ण कामगिरी म्हणजे स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यात त्यांनी बजावलेली भूमिका होय.
- त्यांनी त्यांचे संपूर्ण जीवन एका महान मुक्तीकार्याला वाहून नेले. व आपले सर्व या देशाला अर्पण केले.
- त्यांच्या या महान कार्यामुळे त्यांना १४ एप्रिल १९९० रोजी मरणोत्तर "भारतरत्न" हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला.

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

49937

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

| | | | |
|---|---|---|---|
| Suppliment No. : | शिवानीत (संयुक्ता) प्रेमाळे | Signature of Supervisor | [signature] |
| Roll No. : | 1218133 | Subject : | |
| Class : | | Test / Tutorial No. : | 9/15 [signature] |
| | | Div. : | |

प्र.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्याची माहिती थोडक्यात स्पष्ट करा.

आधुनिक महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या चळवळीमध्ये सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळी प्रमाणाचे दलित चळवळीला महत्त्वाचे स्थान आहे. हिंदू समाजाने बहिष्कृत आणि तिरस्कृत ठेवलेल्या जातीना दलित म्हणले जाते. दलित हा शब्द सामान्य दृष्टया मागास असलेल्या समाजाचे प्रतिनिधीत्व करतो. दलितांमध्ये स्वाभिमान आत्मविश्वास निर्माण करून त्यांना संघटित करण्याचे व न्याय्य हक्कासाठी संघर्ष करण्यासाठी तयार केले. दलित चळवळ ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या यांच्या पूर्वीच्या काळात सुरू झाली असली. तरी तिला चळवळीचे स्वरूप ख-या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य बांधवांना अत्याचार व गुलाम गिरितून मुक्त करण्याबरोबरच भारतीय घटनेनुसार त्यांना आर्थिक विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे अलौकिक कार्य केले. म्हणूनच भारतीय घटनेचे शिल्पकार व कोट्यावधी दलितांच्या जिवनाचे उद्धारक म्हणून त्याचे कार्य वेगळे व असामान्य आहे.

* जन्म व शिक्षण :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेश मधील महू येथे एका गरिब दलित कुटुंबात झाला होता.

- त्यांचे पूर्ण नाव भिमराव रामजी आंबेडकर असे होते.
- रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबेवडे हे त्यांचे मूळ गाव.
- वडील रामजी सैन्यात सुभेदार असल्याने शिक्षण व संस्कार लहानपणापासून त्यांच्या अंगी बाणली होते.
- त्यांच्या आई भिमाबाई लहानपणी वारल्यामुळे त्यांच्या वडीलांनी त्यांचे पालन केले.
- त्यांच्या वर चांगले संस्कार व्हावेत म्हणून ते दक्ष असत.
- त्यांना वाचनांची आवड असल्यामुळे घरात ग्रंथ संग्रहीतीच मुलांनाही पुस्तके आणून देत असत.
- बाबासाहेबांचे वडील रामजी आंबेडकर सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर त्यांना सातारा येथे चांगली नोकरी मिळाली.
- १९०७ मध्ये बाबासाहेब मॅट्रीक परिक्षा पास झाले.
- पुढील शिक्षणासाठी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेज मध्ये त्यांनी प्रवेश घेतला.
- १९१२ मध्ये ते इंग्रजी व पर्शियन विषय घेऊन बी.ए. ची परिक्षा उत्तीर्ण झाले.
- त्यांच्यानंतर परदेशी शिक्षणासाठी त्यांना महाराज सयाजीराव गायकवाड त्यांच्या तर्फे शिष्यवृत्ती दिली गेली.
- त्यांना अर्थशास्त्र या विषयात एम.ए.ची पदवी १९१५ साली संपादन केली.
- १९१६ मध्ये कोलंबिया विद्यापिठाचे पी.एच.डी. पदवीसाठी त्यांनी ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेचा विकास या विषयावर प्रबंध लिहला.
- १९२३ मध्ये बॅरिस्टरची परिक्षा पास होऊन ते परत आले.

* सामाजिक कार्य :-

- आंबेडकरांना बालपणापासून शिक्षण घेताना सार्वजनिक ठिकाणे व बडोदा संस्थानामध्ये नोकरी करत असताना पदोपदी अपमानास्पद वागणूक मिळाली.
- त्यामुळे भारतातील सामाजिक विषमतेबद्दल आंबेडकरांना चीड निर्माण झाली होती.
- आंबेडकरांच्या मते, ज्या प्रमाणे कोणत्याही राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याचा अधिकार नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही एका विशिष्ट वर्गाला दुसऱ्या वर्गावर अधिसत्ता गाजवण्याचा अधिकार नाही.
- म्हणूनच आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात करताना त्यांनी अस्पृश्यांचा त्यांचे नैसर्गिक हक्क व न्याय मिळवून देण्याच्या कार्याला प्रारंभ केला.
- दलित मुक्ती लढ्यांद्वारे बहुजनांमध्ये अस्मिता, स्वत्व, सामाजिक विषमतेबद्दलची निर्माण करण्याचे काम आंबेडकरांनी केले.

* माणगाव अस्पृश्यता निवारण परिषद :-

- नागपूर व माणगाव येथे आयोजित अस्पृश्यता निवारण परिषदांमध्ये आंबेडकर सहभागी झाले होते.
- 22 मार्च 1920 रोजी माणगाव येथील परिषदामध्ये राजर्षी शाहू महाराजांनी आंबेडकरांविषयी गौरवोद्गार काढताना म्हटले की माझ्या राज्यातील बहिष्कृत प्रजाजनांनी, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला याबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्ण अभिनंदन करतो.
- माझी खात्री आहे की, डॉ आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत.
- शाहू महाराजांनी भविष्यवाणी ही तंतोतंत खरी ठरली.

* महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह :-

- सरकारने १९२६ मध्ये कायदा सार्वजनिक पाण्याच्या जागा सर्वांसाठी खुल्या केल्या.
- परंतु त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नाही.
- महाड येथील चवदार तळ्याचे पाणी भरण्यास अस्पृश्यांना मज्जाव केला होता.
- त्यावेळी बाबासाहेबांनी स्वतः चवदार तळ्यावर जाऊन पाणी पिण्याचे ठरेल.
- २० मार्च १९२७ रोजी हजारो अनुयायांसह चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले.

* मनस्मृतीचे दहन :-

- महाड येथे भरलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या सत्याग्रह परिषदेत सनातनी हिंदू समाजाच्या धर्म ग्रंथ असलेल्या मनस्मृती चे दहन करण्याचा निर्णय घेतला.
- मनस्मृतीचे जन्माधिष्ठ वर्ण व्यवस्थेचे समर्थन करून सामाजिक विषमतेला व त्यावर आधारित जातिव्यवस्थेला आधार प्राप्त करून दिला होता.

* भारतीय घटनेचे शिल्पकार :-

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशासाठी केलेली अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यात यांनी बजावलेली भूमिका होय.

- त्यांच्या या महान कार्याविषयी त्यांना १४ एप्रिल १९९० रोजी मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला.

|| ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ||
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

मोहिनी संजय पाटील

VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.
(Empowered Autonomous)

SUPPLIMENT

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | mane |
| Students Sign. : | |
| Seat No. : | 1216136 |
| Seat No. in words : | |
| Suppliment No. : | 8/15 |
| | 17317 |
| Centre | |

Q:2
प्र. क्र. / Q. No.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्याची माहिती थोडक्यात स्पष्ट करा.

आधुनिक महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या चळवळीमध्ये सत्यशोधक व ब्राम्हणेत्तर चळवळी प्रमाणाचे दलित चळवळीला महत्त्वाचे स्थान आहे. हिंदू समाजाने बहिष्कृत आणि तिरस्कृत ठेवलेल्या जातींना दलित म्हटले जाते. दलित हा शब्द सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या समाजाचे प्रतिनिधीत्व करतो. दलितांमध्ये स्वाभिमान, आत्मविश्वास निर्माण करून त्यांना संघटीत करण्याचे व न्याय्य हक्कासाठी त्यांना सहीष करण्यास तयार करण्याचे कार्य दलित चळवळीने केले. दलित चळवळ ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्वीच्या काळात सुरु झाली. असली तरी तिला चळवळीचे स्वरूप खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना अत्याचार व गुलामगिरीतून मुक्त करण्याबरोबरच भारतीय घटनेनुसार त्यांना आर्थिक विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे अलौकिक कार्य केले. म्हणूनच भारतीय घटनेचे शिल्पकार व कोट्यावधी दलितांच्या जीवनाचे उद्धारक म्हणून त्यांचे कार्य वेगळे व असामान्य आहे.

* जन्म व शिक्षण :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेश मधील 'महू' येथे एका गरिब दलित कुटुंबात झाला होता.

| 02 | Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks | | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

- त्यांचे पूर्ण नाव भिमराव रामजी आंबेडकर असे होते.
- रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबवडे हे त्यांचे मूळ गाव.
- वडील रामजी सैन्यात सुभेदार असल्याने शिक्षण व शिस्त लहानपणापासून त्यांच्या अंगी ताठाली होती.
- त्यांची आई भिमाबाई लहानपणी वारल्याने त्यांचे वडिलांनी त्यांचे पालन केले. त्यांच्या वर चांगले संस्कार व्हावेत म्हणून ते दक्ष असत.
- त्यांना वाचनाची आवड असल्यामुळे घरात ग्रंथ संग्रह होता मुलांनाही ते चांगली पुस्तके आणून देत असत.
- बाबासाहेबांचे वडिल रामजी आंबेडकर सैन्यातून निवृत्त झाल्या नंतर त्यांना सातारा इथे चांगली नोकरी मिळाली.
- 1907 मध्ये मॅट्रीक परिक्षा पास झाले. पुढील शिक्षणासाठी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेज मध्ये प्रवेश घेतला.
- 1912 मध्ये ते इंग्रजी व पर्शियन विषय घेऊन बी.ए.ची परिक्षा उत्तीर्ण झाले.
- त्याच्यानंतर परदेशी शिक्षणांसाठी त्यांना महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या तर्फे शिष्यवृत्ती दिली गेली.
- त्यांनी अर्थशास्त्र या विषयात एम.ए.ची पदवी 1915 साली संपादन केली.
- 1916 मध्ये कोलंबिया विद्यापीठाचे पीएच.डी. साठी त्यांनी ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेचा विकास या विषयावर प्रबंध लिहला.
- 1923 मध्ये बॅरिस्टरची परिक्षा पास होऊन ते भारतात परतले.

*** सामाजिक कार्य :**

- आंबेडकरांना बालपणापासून शिक्षण घेताना सार्वजनिक ठिकाणी व बडोदा संस्थानामध्ये नोकरी करत असताना पदोपदी अपमाना-स्पद वागणूक मिळाली.
- त्यामुळे भारतातील सामाजिक विषमतेबद्दल आंबेडकरांना चीड निर्माण झाली होती.
- आंबेडकरांच्या मते, ज्या प्रमाणे कोणत्याही राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याचा अधिकार नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही एका विशिष्ट वर्गाला दुसऱ्या वर्गावर अधिसत्ता गाजवण्याचा अधिकार नाही.
- म्हणूनच आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात करताना त्यांनी अस्पृश्यांचा त्यांचे नैसर्गिक हक्क व न्याय मिळवून देण्याच्या कार्याला प्रारंभ केला.
- दलित मुक्ती लढ्यांद्वारे बहुजनांमध्ये अस्मिता, स्वत्व, सामाजिक विषमतेबद्दलची चीड निर्माण करण्याचे काम आंबेडकरांनी केले.

*** माणगांव अस्पृश्यता निवारण परिषद :-**

- नागपूर व माणगाव येथे आयोजित अस्पृश्यता निवारण परिषदांमध्ये आंबेडकर सहभागी झाले होते.
- 20 मार्च 1920 रोजी माणगाव येथील परिषदमध्ये राजर्षी शाहू महाराजांनी आंबेडकरांविषयी गौरवोद्गार काढताना म्हटले की माझ्या राज्यातील बहिष्कृत प्रजाजनांनी, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला याबद्दल मी तुमचे अंतःस्फूर्त अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, डॉ आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत.
- शाहू महाराजांची भविष्यवाणी ही तंतोतंत खरी ठरली.

| 04 | Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks | | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

* महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह :-
- सरकारने 1926 मध्ये कायदा करून सार्वजनिक पाणवठ्या-चा जागा सर्वांसाठी खुल्या केल्या.
- परंतू याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नाही.
- महाड येथील चवदार तळ्याचे पाणी भरण्यास अस्पृश्यांना मज्जाव केला होता.
- म्हणून बाबासाहेबांनी स्वत: चवदार तळ्यावर जाऊन पाणी पिण्याचे ठरले.
- 20 मार्च 1927 रोजी हजारो अनुयायांसह चवदार तळ्यातील पाणी प्राशन केले.

* मनुस्मृतीचे दहन :-
- महाड येथे भरलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या सत्याग्रह परिषदेत सनातनी हिंदू समाजाच्या धर्मग्रंथ असलेल्या मनुस्मृती चे दहन करण्याचा निर्णय घेतला.
- मनुस्मृतीचे जन्मसिद्ध वर्ण व्यवस्थेचे समर्थन करून सामाजिक विषमतेला व त्यावर आधारित जातिव्यवस्थेला आधार प्राप्त करून दिला होता.

* भारतीय घटनेचे शिल्पकार :-

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशासाठी केलेली अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यात त्यांनी बजावलेली भूमिका होय.
- त्यांच्या या महान कार्याविषयी त्यांना 14 एप्रिल 1990 रोजी मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला.

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ॥ – शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Prathviraj Pralhad Desai

M.A-1 [Sem-II]

7009

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | [signature] |
| Students Sign. : | |
| Seat No. : | 1218117 |
| Seat No. in words : | |
| Suppliment No. : | |
| | 4781 |
| Centre | |

9/15

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.
(Empowered Autonomous)

**SUPPLIMENT**

प्र. क्र. Q. No.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्याची माहिती सविस्तर लिहा.

आधुनिक महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या चळवळीमध्ये सत्यशोधक व ब्राम्हणेतर चळवळी प्रमाणेच दलित चळवळीला महत्वाचे स्थान आहे. हिंदु समाजाने बहिष्कृत आणि तिरस्कृत ठेवलेल्या जातींना दलित म्हटले जाते. दलित हा शब्द सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करतो. दलितांमध्ये स्वाभिमान, आत्मविश्वास, निर्माण करून त्यांना संघटीत करण्याचे व न्याय हक्कासाठी त्यांना संघर्ष करण्यास तयार करण्याचे कार्य दलित चळवळीने केले. दलित चळवळ ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना अत्याचार व गुलामगिरीतून मुक्त करण्याबरोबरच भारतीय घटनेनुसार त्यांना आर्थिक विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे अलौकिक कार्य केले. म्हणूनच भारतीय घटनेचे शिल्पकार व कोट्यावधी दलितांच्या जीवनाचे उद्धारक म्हणून त्यांचे कार्य वेगळे व असामान्य आहे.

जन्म व शिक्षण -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशमधील 'महू' येथे एका गरीब दलित कुटुंबात झाला होता.

| 02 Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

त्यांचे पूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर असे होते. रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबवडे हे त्यांचे मुळ गाव.

- वडील 'रामजी' सैन्यात सुभेदार असल्याने शिक्षण व शिस्त लहानपणापासून त्यांच्या अंगी बाणली होती.
- त्यांची आई भीमाबाई लहानपणी वारल्याने त्यांच्या वडीलांनी त्यांचे पालन पोषण केले, व त्यांच्यावर चांगले संस्कार केले.
- त्यांना वाचनाची आवड असल्यामुळे घरात ग्रंथ संग्रह होताच व मुलांनाही ते चांगली पुस्तके आणून देत.
- म्हणून बाबासाहेबांची बालपण सातारा येथे गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण सातारा व मुंबई येथे कॉलेज झाले.
- १९०७ मध्ये मॅट्रिक परीक्षा पास झाले व पुढील शिक्षणासाठी मुंबईला एल्फिस्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.
- १९१२ मध्ये ते इंग्रजी व पर्शियन विषय घेऊन बी.ए. ची परिक्षा उत्तीर्ण झाले.
- त्यानंतर परदेशी शिक्षणासाठी त्यांना महाराज सयाजीराव गायकवाड यांनी मदत केली.
- सयाजीराव गायकवाड यांच्या तर्फे त्यांना शिष्यवृत्ती दिली गेली.
- त्यांनी अर्थशास्त्र विषयात एम.ए. ची पदवी १९१५ साली संपादन केली.
- १९१६ मध्ये कोलंबिया विद्यापीठातच पीएच.डी. साठी त्यांनी ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेचा विकास या विषयावर प्रबंध लिहला.
- १९२३ मध्ये बॅरिस्टरची परीक्षा पास होऊन ते भारतात परतले.

| Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | 03 |

प्र. क्र. Q. No.

सामाजिक कार्य -

- आंबेडकरांना बालपणापासून शिक्षण घेताना सार्वजनिक ठिकाणी व बडोदा संस्थानामध्ये नोकरी करत असताना पदोपदी अपमानास्पद वागणूक मिळाली.
- त्यामुळे भारतातील सामाजिक विषमतेबद्दल आंबेडकरांना चिड निर्माण झाली होती.
- आंबेडकरांच्या मते "ज्या प्रमाणे कोणत्याही राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याचा अधिकार नाही, त्याच प्रमाणे कोणत्याही एका विशिष्ट वर्गाला दुसऱ्या वर्गावर आधिसत्ता गाजविण्याचा अधिकार नाही"
- म्हणूनच आपल्या सार्वजनिक जिवनाची सुरुवात करताना त्यांनी अस्पृश्यांना त्यांचे नैसर्गिक हक्क व न्याय मिळवून देण्याच्या कार्याला प्रारंभ केला.
- शाहू महाराजांनी दिलेल्या आर्थिक मदतीच्या साहाय्याने बाबासाहेबांनी १९२० मध्ये मुकनायक हे पाक्षिक सुरु केले व सामाजिक विषमतेवर प्रखर टिका केली.

- माणगाव अस्पृश्यता निवारण परिषद -

- कोल्हापुर व माणगाव येथे आयोजित अस्पृशता निवारण परिषदेमध्ये आंबेडकर सहभागी झाले होते.
- २२ मार्च १९२० रोजी माणगाव येथील परिषदेमध्ये राजर्षी शाहू महाराजांनी आंबेडकरांविषयी गौरवोद्गार काढताना म्हटले की माझ्या राज्यातील बहिष्कृत प्रजाजनांनो, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला याबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्ण अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, डॉ. आंबेडकर तुमचा उध्दार केल्याशिवाय राहणार नाहीत.
- शाहू महाराजांची भविष्यवाणी ही तंतोतंत खरी ठरली.

| 04 Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | |

प्र. क्र.
Q. No.

* महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह -

- सरकारने १९२६ मध्ये कायदा करून सार्वजनिक पाणवठ्यांच्या जागा सर्वांसाठी खुल्या केल्या.
- परंतु याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नाही.
- महाड येथील चवदार तळ्याचे पाणी भरण्यास अस्पृश्यांना मज्जाव केला होता.
- यावेळी बाबासाहेबांनी स्वत: चवदार तळ्यावर जाऊन पाणी पिण्याचे ठरले. यानुसार २० मार्च १९२७ रोजी हजारो अनुयायांसह चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले.

* मनुस्मृतीचे दहन -

महाड येथे भरलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या सत्याग्रह परिषदेत स्वतानी हिंदु समाजाचा धर्मग्रंथ असलेल्या मनुस्मृतीचे दहन करण्याचे निर्णय घेतला होता.
- मनुस्मृतीने जन्माधिष्ठित वर्ण व्यवस्थेचे समर्थन करून सामाजिक विषमतेला व त्यावर आधारित जातिव्यवस्थेला आधार प्राप्त केला.
- याचा निषेध करण्यासाठी बाबासाहेबांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन केले.

* भारतीय घटनेचे शिल्पकार -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशासाठी केलेली अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे, स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यात त्यांनी बजावलेली भूमिका होय.
- त्यांनी त्यांचे संपूर्ण जीवन एका महान मुक्तिकार्याला वाहून नेले व आपले सर्व या देशाला अर्पण केले.
- त्यांच्या या महान कार्याबद्दल त्यांना १४ एप्रिल १९९० रोजी मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला.

|| ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ||
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.
(Empowered Autonomous)

नाव -: श्रेया सुरेश देरे.
Sem - II
M.A. I year

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign.: | [signature] |
| Students Sign.: | |
| Seat No.: | |
| Seat No. in words: | |
| Suppliment No.: | |
| | 4788 |
| ~~Centre~~ Paper No - | |

12/15

विषय - H.O.R.M.
7006

प्र. क्र. / Q. No.

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन व कार्याची सविस्तर माहिती लिहा.

• प्रस्तावना -:

आधुनिक ~~महा~~ महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या चळवळीमध्ये सत्यशोधक व ब्राह्मणेत्तर चळवळी प्रमाणेच दलित चळवळीला महत्त्वाचे स्थान आहे. हिंदू समाजाने बहिष्कृत आणि तिरस्कृत ठेवलेल्या जातींना दलित म्हटले जाते. दलित हा शब्द सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करतो. थोडक्यात, समाजातील दुर्बल व अन्याय - अत्याचार यांचे बळी ठरलेल्या घटकांना उद्देशून दलित असा शब्द प्रयोग केला जातो. दलितांमध्ये स्वाभिमान, आत्मविश्वास निर्माण करून त्यांना संघटीत करण्याचे व न्याय हक्कासाठी त्यांना संघर्ष करण्यास तयार करण्याचे कार्य दलित चळवळीने केले. दलित चळवळ ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्वीच्या काळात सुरु झाली असली तरी तिला चळवळीचे स्वरुप खऱ्या अर्थाने डॉ. आंबेडकरांनी दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना अत्याचार

| 02 | Section | Q. No. | | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | Marks | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

व गुलामगिरीतून मुक्त करण्याबरोबरच भारतीय घटनेनुसार त्यांना आर्थिक विकासाच्या संधी उपलब्ध करुन देण्याचे अलौकीक कार्य केले. म्हणूनच भा घटनेचे शिल्पकार व कोट्यावधी दलितांच्या जीव उध्दारक म्हणून त्यांचे कार्य वेगळे व असामान्य

* जन्म व पूर्व वृत्तांत

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८ रोजी मध्य प्रदेश महू येथे एका गरिब दलित कुटुंबात झाला होता. त्यांचे पूर्ण नाव भीमराव रामजी आंबे असे होते. रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्या ल आंबवडे हे त्यांचे मुळ गाव. वडील रामजी सैन्य सुभेदार असल्याने शिक्षण व शिस्त लहानपणापासून त्यांच्या अंगी बाणली होती. त्यांची आई भीमाबाई लहानपणीच वारल्याने त्यांच्या वडीलांनी त्यांचे पालन पोषण केले व चांगले संस्कार त्यांच्यावर कोवेत म्हणून ते दक्ष असत. त्यांना स्वत: वाचनाची आवड असल्यामुळे घरात ग्रंथ संग्रह होताच; मुलांनाही ते चांगली पुस्तके वाचावयास आणून देत असत. म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्यांच्या ठायी आढळते.

* शिक्षण

बाबासाहेबांचे वडील रामजी आंबेडकर सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर त्यांना सातारा येथे दुसरी नोकरी मिळाली. त्यामुळे बाबासाहेबांचे बालपण सातारा येथेच गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण सातारा व मुंबई या ठिकाणी झाले. १९०७ मध्ये

| Q. No. | | | | | | | | | | | | | 03 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | | | | | | |

ते मॅट्रीक ची परिक्षा पास झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांनी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेज मध्ये प्रवेश घेतला व 1912 मध्ये ते इंग्रजी व पर्शियन विषय घेऊन बी.ए ची परिक्षा उत्तीर्ण झाले. बालविवाहाची प्रथा त्या काळी रुढ असल्यामुळे वयाच्या 17 व्या वर्षी त्यांचा विवाह रमाबाई नावाच्या मुलीबरोबर झाला. परंतु शिक्षणाविषयी आवड असल्यामुळे विवाहानंतरही त्यांनी आपले शिक्षण सुरु ठेवले. घरची परिस्थिती हालाखीची असल्यामुळे शिक्षणक्रम चालू ठेवणे आंबेडकरांना कठीण होऊ लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बडोद्याचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड यांनी अमेरिकेतील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर केल्यामुळे कोलंबिया विद्यापीठात अर्थशास्त्र विषयात एम.ए. ची पदवी 1915 साली त्यांनी संपादन केली. 1916 मध्ये कोलंबिया विद्यापीठातच पीएच.डी. साठी त्यांनी 'ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेचा विकास' या विषयावर प्रबंध लिहिला. अमेरिकेतील अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर बाबासाहेब आंबेडकर कायदा व अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी इंग्लंड ला गेले. परंतु आर्थिक अडचणीमुळे त्यांना ते शिक्षण अर्धवट सोडावे लागले. भारतात आल्यानंतर बडोदा संस्थानामध्ये त्यांनी काही काळ नोकरी केली. परंतु नोकरीत इतरांकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्यामुळे ती नोकरी सोडून परत मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. राजर्षी छ. शाहू महाराज यांनी केलेल्या आर्थिक मदतीमुळे आंबेडकर पुन्हा इंग्लंडला गेले व एम.एस्सी (अर्थशास्त्र) व डी.एस्सी ह्या पदव्या त्यांनी मिळवल्या. 1923 मध्ये बॅरिस्टरची परिक्षा पास होऊन ते भारतात परतले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य :-

आंबेडकरांना बालपणापासून शिक्षण घेताना त्यांना ठिकाणी व बडोदा संस्थानामध्ये नोकरी करत असताना पदोपदी अपमानास्पद वागणूक मिळाली. त्यामुळे भारतातील सामाजिक विषमतेबद्दल आंबेडकरांना चीड निर्माण झाली होती. आंबेडकरांच्या मते, "ज्या प्रमाणे कोणत्याही राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याचा अधिकार नाही, त्याच प्रमाणे कोणत्याही एका विशिष्ट वर्गाला दुसऱ्या वर्गावर अधिसत्ता गाजविण्याचा अधिकार नाही" म्हणूनच आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरूवात करताना त्यांनी अस्पृश्यांना त्यांचे नैसर्गिक हक्क व न्याय मिळवून देण्याच्या कार्याला प्रारंभ केला. दलित मुक्ती लढ्याद्वारे बहुजनांमध्ये अस्मिता, स्वत्व, सामाजिक विषमतेबद्दलची चीड निर्माण करण्याचे काम आंबेडकरांनी केले. शाहू महाराजांनी दिलेल्या आर्थिक मदतीच्या साहाय्याने बाबासाहेबांनी 1920 मध्ये मूकनायक हे पाक्षिक सुरू केले व सामाजिक विषमतेवर प्रखर टिका केली.

1. माणगाव अस्पृश्यता निवारण परिषद

नागपूर व कोल्हापूरातील माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदांमध्ये आंबेडकर सहभागी झाले होते. 22 मार्च 1920 रोजी माणगाव येथील परिषदेमध्ये राजर्षी शाहू महाराजांनी आंबेडकरांविषयी गौरवोद्गार काढले म्हटले की, "माझ्या राज्यातील बहिष्कृत प्रजाजनांनो तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला याबद्दल तुमचे अंत:करणपूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की डॉ. आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत.

प्र. क्र.
Q. No.

इतकेच नव्हे तर, अशी एक वेळ येईल की, ते सर्व हिंदुस्थानाचे पुढारी होतील. अशी माझी मनोदेवता मला सांगते." शाहू महाराजांची ही भविष्यवाणी पुढील काळात तंतोतंत खरी ठरली.

2. बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना (1924)

इंग्लंड मधून भारतात परतल्यावर बाबासाहेबांनी पुन्हा एकदा आपल्या सार्वजनिक कार्याला नव्या जोमाने सुरुवात केली. अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करून त्यांना अस्पृश्यतेच्या प्रथेविरुद्ध संघर्ष करण्यास प्रवृत्त केले, व त्यासाठी 20 जुलै 1924 रोजी बाबासाहेबांनी "बहिष्कृत हितकारिणी सभेची" स्थापना केली. याशिवाय अस्पृश्य समाजाचे सामाजिक व राजकीय प्रश्न मांडण्यासाठी या संस्थेची स्थापना करून शाळा, ग्रंथालय व वसतिगृहे सुरु करण्याचे काम या संघटनेने केले.

3. महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह

बाबासाहेबांची 1927 मध्ये मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाचे सदस्य म्हणून नियुक्ती झाली. सरकारने 1926 मध्ये कायदा करून सार्वजनिक पाणवठ्याच्या जागा सर्वांसाठी खुल्या केल्या.

| 02 | Section | Q. No. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

परंतु याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नव्हती.
येथील चवदार तळ्याचे पाणी भरण्यास अस्पृश्यांना
केला होता. तेथील नगरपालिकेने एक ठराव करून ते
अस्पृश्यांना खुले केले. परंतु सवर्ण हिंदूंनी या तळ्या
पाणी भरण्यास अस्पृश्यांना विरोध केला. बाबासाहेबां
१९ व २० मार्च १९२७ रोजी महाड येथे कुलाबा
जिल्हा बहिष्कृत परिषद आयोजित केली. याचे ते अ
होते. या परिषदेमध्ये चवदार तळ्यावर जाऊन पाणी
पिण्याचे ठरले. यानुसार आंबेडकरांनी २० मार्च १९२७ रो
हजारो अनुयायांसह चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले.

५. मनुस्मृतीचे दहन

महाड येथे भरलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या सत्याग्रह परिषदेत सनातनी हिंदू समाजाचा धर्मग्रंथ असलेल्या मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय घेतला होता. मनुस्मृतीने जन्माधिष्ठीत वर्ण व्यवस्थेचे समर्थन करून सामाजिक विषमतेला व त्यावर आधारित जातीव्यवस्थेला आधार प्राप्त करून दिला होता. तेव्हा सामाजिक विषमता, व उच्च-नीच भेदभाव यांचे समर्थन करणाऱ्या या ग्रंथाचा प्रतिकात्मक निषेध करण्यासाठी बाबासाहेबांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे जाहीररित्या दहन केले. मनुस्मृतीचे दहन करून यापुढे दलित जाती-जमाती हिंदू धर्माने दिलेली अन्यायाची वागणूक सहन करणार नाहीत हे स्पष्टपणे जाहीर केले.

| Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | | | | | 03 |

5. मंदिर प्रवेशाची चळवळ

हिंदू धर्मातील उच्चवर्णीयांनी अस्पृश्यांना मंदिर प्रवेशाचा हक्क नाकारला होता. याबाबत आंबेडकर म्हणतात की, "हिंदुत्व ही जितकी स्पृश्यांची मालमत्ता आहे तितकीच ती अस्पृश्यांचीही आहे. म्हणून मंदिर प्रवेशाचा आमचा हक्क मान्य झालाच पाहिजे".

अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मंदिरे बांधणे हा अस्पृश्यता निवारण्याचा मार्ग नाही. तर सार्वजनिक व्यवस्था सर्वांसाठी खुल्या करून अस्पृश्यता निवारण करता येईल. यासाठी ऑक्टोबर 1929 मध्ये पुण्याच्या पर्वती येथील मंदिरात प्रवेश करण्यासाठी पहिल्या सत्याग्रह करण्यात आला. या प्रसंगी सत्याग्रहींना सवर्णीयांनी मारहाणही केली. पोलिसांनी ही परिस्थिती नियंत्रणाखाली आणली.

मंदिर प्रवेशाचा अस्पृश्यांचा हक्क मान्य व्हावा यासाठी आंबेडकरांनी नाशिक येथे 15 हजाराहून ~~केला परंतु~~ अधिक अनुयायांसोबत 2 मार्च 1930 रोजी काळाराम मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला, परंतु मंदिर प्रवेशाचा निर्णय तातडीने लागला नाही. डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहातून अस्पृश्यांची अस्मिता जागी करण्याचा प्रयत्न केला.

6. बौद्ध धर्माचा स्वीकार

हिंदू समाजातील सामाजिक विषमता नष्ट व्हावी व अस्पृश्यांना आपले समान अधिकार प्राप्त व्हावेत तसेच चळवळी द्वारे अस्पृश्यांना न्याय मिळावा यासाठी बाबासाहेब यांनी प्रयत्न केले. परंतु तरीही सवर्ण हिंदूंच्या वर्तनामध्ये फारसा फरक पडला नाही. आंबेडकरांना या चळवळीसाठी

04 Section | Q. No. | Marks

प्र. क्र. Q. No.

व्यतीत केलेले श्रम, काल व धन वाया गेल्याची खात्री झाली म्हणूनच आंबेडकरांनी हिंदू धर्मातून धर्मांतर करण्याचे ठरविले ते म्हणतात, " मी अस्पृश्य जातीत जन्मास आलो हा काही माझा अपराध नाही. परंतु मरताना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही."

सवर्ण हिंदूकडून अस्पृश्यांना कधीच न्याय मिळणार नाही याची खात्री पटल्यामुळे आंबेडकरांनी धर्मांतर करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे ६ लाख अनुयायांसह बौद्ध धर्माची दिक्षा घेतली.

दीक्षा घेण्याच्या दिवशीच आंबेडकर म्हणतात "मी एकदा अस्पृश्यांच्या प्रश्नांसंबंधी गांधीजींशी चर्चा करीत असताना त्यांना मी म्हणालो होतो की, अस्पृश्यतेच्या प्रश्नासंबंधी तुमच्याशी माझे मतभेद असले तरी वेळ येईल तेव्हा मी ह्या देशाला कमीत कमी धोका लागेल असा मार्ग स्वीकारेन म्हणून बौद्ध धर्म हा भारतीय संस्कृतीचाच एक भाग आहे. ह्या देशाची संस्कृती, इतिहास याच्या परंपरेला धोका लागणार नाही. याची मी खबरदारी घेतली आहे." सनातनी हिंदू धर्मव्यवस्थेने नाकारलेले दलितांचे अधिकार आणि माणूसपण मिळवून देण्यासाठी त्यांनी हा ऐतिहासिक निर्णय घेतला.

धर्मांतरासाठी बौद्ध धर्माची निवड करण्यात देखील आंबेडकरांचे दूरदर्शित्व व राष्ट्रहिताची तळमळ यांचे दर्शन होते.

|| ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ||

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

(अधिकारप्रदान स्वायत्त)
कोल्हापूर

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.

**(Empowered Autonomous)**

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | |
| Students Sign. : | |
| Seat No. : | |
| Seat No. In words : | |
| Suppliment No. : 4831 | |
| Centre | |

प्र. क्र.
Q. No.

## राजकिय कार्य-:

अस्पृश्यांना राजकीय दृष्ट्या संघटीत करण्यात आणि त्यांना राजकरणात स्वतःचा आवाज प्राप्त करुन देण्यात आंबेडकरांनी सिंहाचा वाटा उचलला होता. परंतु बाबा. साहेबांना केवळ अस्पृश्यांचे नेते समजणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणारे आणि आपल्या अज्ञानाचे प्रदर्शन ठरेल. राजकीय क्षेत्रात त्यांनी देशासाठी केलेले कार्य खूपच महत्त्वाचे आहे. त्यांचे राजकीय विचार देशाच्या दृष्टीने आजही उपयुक्त आहेत.

१९२७ मध्ये सरकारने आंबेडकरांना मुंबई प्रांताच्या विधीमंडळाचे सदस्य म्हणून नियुक्त केले. तेव्हापासून त्यांचे राजकीय कार्य प्रत्ययाला येऊ लागले होते.

१९३० ते १९३२ या काळात भारताला जबाबदार शासन पद्धती देण्यासाठी व घटनात्मक प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी लंडन येथे तीन गोलमेज परिषदांचे आयोजन केले होते. यावेळी आंबेडकर अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. त्या ठिकाणी त्यांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. १९३२ मध्ये इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी 'जातीय निवाडा' जाहीर करुन आंबेडकरांची मागणी मान्य केली.

| 02 Section | Q. No. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

## १. पुणे करार :

अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची निर्मिती करण्यास महात्मा गांधींचा विरोध होता. अस्पृश्यांना हिंदू पासून वेगळे करण्याचा हा ब्रिटिशांचा डाव आहे असे त्यांचे म्हणणे होते. अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाला मान्यता दिली तर ते उर्वरित हिंदू पासून दूर जातील म्हणून जातीय निवाड्याच्या या तरतुदी विरोधात महात्मा गांधींनी पुणे येथील येरवडा तुरुंगामध्ये प्राणांतिक उपोषण सुरु केले. गांधीजींचे प्राण वाचावेत म्हणून आंबेडकर तडजोडीला तयार झाले. त्यानुसार २५ सप्टेंबर 1932 रोजी पुणे करार गांधीजी व आंबेडकर यांच्यामध्ये झाला. या करारान्वये आंबेडकरांनी स्वतंत्र मतदार संघाच्या ऐवजी अस्पृश्यांना कायदेमंडळात राखीव जागा असाव्यात असे मान्य करून केले व गांधीजींचे प्राण वाचविले.

## २. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना : 1936.

1935 च्या भारत सुधारणा कायद्यान्वये 1937 मध्ये प्रांतिक निवडणुका होणार होत्या. त्या संधीचा लाभ घेऊन अस्पृश्यांचा लढा अधिक शक्तीमान करण्यासाठी 16 ऑगस्ट 1936 रोजी बाबासाहेबांनी 'स्वतंत्र मजूर पक्षाची' स्थापना केली. या पक्षाने 1937 च्या निवडणुकीत 13 जागा जिंकल्या. बाबासाहेब भायखळा परळ या राखीव जागेवर निवडून आले. स्वतंत्र मजूर पक्षाने 1937 ते 1942 या काळात गिरणी कामगारांना न्याय मिळवून देणे, खोती पद्धती व महार वतन नष्ट करणे, अस्पृश्यांना शिक्षणात सवलती, शेतकरी व कामगारांचे प्रश्न इ. विरुद्ध आवाज उठविला.

| Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | | | | | 03 |

* शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना:-

अस्पृश्य व दलितांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी व न्याय मिळवून देण्यासाठी देश पातळीवर एक स्वतंत्र पक्ष असावा या हेतूने रावबहादुर. एन. शिवराज, सहकाऱ्यांच्या समवेत बाबासाहेबांनी "अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची" स्थापना १९४२ मध्ये केली. या पक्षाची ३१ कलमी घटना बाबासाहेबांनी स्वतः तयार केली. आंबेडकरांनी १९४२ ते १९४६ या काळात व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात मजूर मंत्री म्हणून काम पाहिले. राजकारणात देखील त्यांनी आपल्या पददलित बांधवांच्या हिताचाच विचार केला, आणि त्यांच्या उन्नतीसाठी अविरत कष्ट घेतले.

* आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य:-

आंबेडकरांना बालपणापासून शिक्षण घेताना सार्वजनिक ठिकाणी व बडोदा संस्थानामध्ये नोकरी करत असताना पदोपदी अपमानास्पद वागणूक मिळाली. त्यामुळे भारतातील सामाजिक विषमते बद्दल आंबेडकरांना चीड निर्माण झाली होती. आंबेडकरांच्या मते " ज्या प्रमाणे कोणत्याही राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याचा अधिकार नाही. त्याच प्रमाणे कोणत्याही एका विशिष्ट वर्गाला दुसऱ्या वर्गावर अधिसत्ता गाजविण्याचा अधिकार नाही." म्हणूनच आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरवात करताना त्यांनी अस्पृश्यांना त्यांचे नैसर्गिक हक्क व न्याय मिळवून देण्याच्या कार्याला प्रारंभ केला. दलित मुक्ती त्यदयाद्वारे बहुजनामध्ये अस्मिता, स्वत्व, सामाजिक विषमतेबद्दलचीड निर्माण करण्याचे काम आंबेडकरांनी केले. शाहु महाराजांनी दिलेल्या आर्थिक मदतीच्या साह्याने बाबासाहेबांनी 1920 मध्ये मूकनायक हे पाक्षिक सुरु केले. व सामाजिक विषमतेवर प्रखर टिका केली.

i]. माणगाव अस्पृश्यता निवारण परिषद.

नागपूर व कोल्हापुरातील माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदांमध्ये आंबेडकर सहभागी झाले होते. 22 मार्च 1920 रोजी माणगाव येथील परिषदेमध्ये राजर्षी शाहूमहाराजांनी आंबेडकरांविषयी गौरवोद्‌गार काढलाना म्हटले की "माझ्या राज्यातील बहिष्कृत प्रजाजनांनो तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला या बद्दल तुमचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की डॉ. बाबासाहेब आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत.

|| ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ||
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

(अभिमतविद्यापीठ स्वायत्त)
कोल्हापूर

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.

**(Empowered Autonomous)**

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | |
| Students Sign. : | |
| Seat No. : | |
| Seat No. in words : | |
| Suppliment No. : | |
| | 17261 |
| Centre | |

प्र. क्र. / Q. No.

इंग्रजांचे नव्हे तर अशी एक वेळ येईल की ते सर्व हिंदुस्थानाचे पुढारी होतील. अशी माझी मनोदेवता मला सांगते शाहू महाराजांची हि भविष्यवाणी पुढील काळात तंतोतंत खरी ठरली.

२. बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना (१९२४)

इंग्लंड मधून भारतात परतल्यावर बाबासाहेबांनी पुन्हा एकदा आपल्या सार्वजनिक कार्याला नव्या जोमाने सुरुवात केली. अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करून त्यांना अस्पृश्यते च्या प्रथेविरुद्ध संघर्ष करण्यास प्रवृत्त केले. व त्यासाठी २० जुलै १९२४ रोजी बाबासाहेबांनी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. या शिवाय अस्पृश्य समाजाचे सामाजिक व राजकीय प्रश्न मांडण्यासाठी या संस्थेची स्थापना करून वाचनालय व वसतिगृहे सुरू करण्याचे काम या संघटनेने केले.

३. महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह.

बाबासाहेबांची १९२७ मध्ये मुंबई प्रांताच्या कायदे मंडळाचे सदस्य म्हणून नियुक्ती झाली. सरकारने १९२६ मध्ये कायदा करून सार्वजनिक पाणवठ्यांच्या जागा सर्वांसाठी खुल्या केल्या.

| 02 Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

परंतु याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नव्हती. महाड येथील चवदार तळ्याचे पाणी भरण्यास अस्पृश्यांना मनाई केली होती. येथील नगरपालिकेने एक ठराव करून हे तळे अस्पृश्यांना खुले केले. परंतु सवर्ण हिंदूंनी या तळ्यावर पाणी भरण्यास अस्पृश्यांना विरोध केला. बाबासाहेबांनी 19 व 20 मार्च 1927 रोजी महाड येथे कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद आयोजित केली. स्वतः ते अध्यक्ष होते. या परिषदेमध्ये चवदार तळ्यावर जाऊन पाणी पिण्याचे ठरले. या नुसार आंबेडकरांनी 20 मार्च 1927 रोजी हजारो अनुयायांसह चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले.

५. मनुस्मृतीचे दहन

महाड येथे भरलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या सत्याग्रह परिषदेत सनातनी हिंदु समाजाचा धर्म ग्रंथ असलेल्या मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय घेतला होता. मनुस्मृतीने जन्माधिष्ठित वर्ण व्यवस्थेचे समर्थन करून सामाजिक विषमतेला व त्यावर आधारित जातीव्यवस्थेला आधार प्राप्त करून दिला होता. सामाजिक विषमता व उच्च नीच भेदभाव यांचे समर्थन करणाऱ्या या ग्रंथाचा प्रतीकात्मक निषेध करण्यासाठी बाबासाहेबांनी 25 डिसेंबर 1927 रोजी मनुस्मृतीचे जाहीररित्या दहन केले. मनुस्मृतीचे दहन करून यापुढे दलित जाती जमाती हिंदु धर्माने दिलेली अन्यायाची वागणूक सहन करणार नाहीत हे स्पष्टपणे जाहीर केले.

| Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | |

03

5. मंदिर प्रवेशाची चळवळ

हिंदू धर्मातील उच्चवर्णीयांनी अस्पृश्यांना मंदिर प्रवेशाचा हक्क नाकारला होता. या बाबत आंबेडकर म्हणतात की, "हिंदुत्व ही जितकी स्पृश्यांची मालमत्ता आहे. तितकीच ती अस्पृश्यांची आहे. म्हणून मंदिर प्रवेशाच्या आमचा हक्क मान्य झालाच पाहिजे."

अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मंदिरे बांधणे हा अस्पृश्यता निवारण्याचा मार्ग नाही. तर सार्वजनिक व्यवस्था सर्वांसाठी खुल्या करून अस्पृश्यता निवारण करता येईल. यासाठी ऑक्टोबर 1929 मध्ये पुण्याच्या पर्वती येथील मंदिरात प्रवेश करण्यासाठी पहिल्यांदा सत्याग्रह करण्यात आला. या प्रसंगी सत्याग्रहींना सवर्णीयांनी मारहाणी केली. पोलिसांनी ही परिस्थिती नियंत्रणाखाली आणली.

मंदिर प्रवेशाच्या अस्पृश्यांच्या हक्क मान्य व्हावा. यासाठी आंबेडकरांनी नाशिक येथे 15 हजारहुन अधिक अनुयायां सोबत 2 मार्च 1930 रोजी काळाराम मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला. परंतू मंदिर प्रवेशाच्या निर्णय तात्काळ लागला नाही. डॉ आंबेडकरांनी त्यांच्या मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहातून अस्पृश्यांची अस्मिता जागी करण्याचा प्रयत्न केला.

6) बौद्ध धर्माचा स्वीकार

हिंदू समाजातील सामाजिक विषमता नष्ट व्हावी व अस्पृश्यांना आपले समान अधिकार प्राप्त व्हावेत तसेच चळवळी द्वारे अस्पृश्यांना न्याय मिळावा यासाठी बाबासाहेब यांनी प्रयत्न केले. परंतू तरीही सवर्ण हिंदूच्या वर्तनामध्ये फारसा फरक पडला नाही. आंबेडकरांना या चळवळीसाठी व्यतीत केलेले श्रम काळ व धन वाया गेल्याची जाणीव झाली म्हणूनच आंबेडकरांनी हिंदू धर्मातून धर्मांतर करण्याचे ठरविले ते म्हणतात.

| 04 | Section | Q. No. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks | | | | | | | | | | | |

प्र. क्र.
Q. No.

"मी अस्पृश्य जातीत जन्मास आलो हा काही माझा अपराध नाही. परंतु मरताना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही." सवर्ण हिंदूकडून अस्पृश्यांना कधीच न्याय मिळणार नाही याची खात्री पटल्यामुळे आंबेडकरांनी धर्मांतर करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार 14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूर येथे 6 लाख अनुयायांसह बौद्ध धर्माची दिक्षा घेतली.

दीक्षा घेण्याच्या दिवशीच आंबेडकर म्हणतात " मी एकदा अस्पृश्यांच्या प्रश्नांसंबंधी गांधीजींशी चर्चा करीत असताना. त्यांना मी म्हणालो होतो की अस्पृश्यतेच्या प्रश्ना संबंधी तुमच्यापाशी माझे मतभेद असले तरी वेळ येईल तेव्हा मी ह्या देशाला कमीत कमी धोका लागेल असा मार्ग स्वीकारेन म्हणून बौद्धधर्म हा भारतीय संस्कृतीचाच एक भाग आहे. ह्या देशाची संस्कृती इतिहास यांच्या परंपरेला धोका लागणार नाही. अशी मी खबरदारी घेतली आहे." सनातनी हिंदू धर्मव्यवस्थेने नाकारलेले दलितांचे अधिकार आणि माणूसपण मिळवून देण्यासाठी त्यांनी हा ऐतिहासिक निर्णय घेतला.

धर्मांतरासाठी बौद्ध धर्माची निवड करण्यात देखील आंबेडकरांचे दूरदर्शित्व व राष्ट्रहिताची तळमळ यांचे दर्शन होते.

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ॥

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

(अभिमतप्राप्त स्वायत्त)
कोल्हापूर

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.

(Empowered Autonomous)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | |
| Students Sign. : | |
| Seat No. : | |
| Seat No. in words : | |
| Suppliment No. : | |
| | 17258 |
| Centre | |

प्र. क्र.
Q. No.

राजकीय कार्य :-

अस्पृश्यांना राजकीय दृष्ट्या संघटित करण्यात आणि त्यांना राजकारणात स्वतःच्या आवाज प्राप्त करून देण्यात आंबेडकरांनी सिंहाचा वाटा उचलला होता. परंतू बाबासाहेबांना केवळ अस्पृश्यांचे नेते समजणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणारे आणि आपल्या अज्ञानाचे प्रदर्शन ठरेल. राजकीय क्षेत्रात त्यांनी देशासाठी केलेले कार्य खूपच महत्वाचे आहे. आहे. त्यांचे राजकीय विचार देशाच्या दृष्टीने आजही उपयुक्त आहेत.

1927 मध्ये सरकारने आंबेडकरांना मुंबई प्रांताच्या विधीमंडळाचे सदस्य म्हणून नियुक्त केले. तेव्हापासून त्यांचे राजकीय कार्य प्रत्ययाला येऊ लागले होते.

1930 ते 1932 या काळात भारताला जबाबदार शासन पद्धती देण्यासाठी व घटनात्मक प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी लंडन येथे तीन गोलमेज परिषदांचे आयोजन केले होते. यापैकी आंबेडकर तीनही परिषदांना अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. या ठिकाणी त्यांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी 1932 मध्ये इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी 'जातीय निवाडा' जाहिर करून आंबेडकरांची मागणी मान्य केली.

| 02 | Section | Q. No. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

1] पुणे करार :-

अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची निर्मिती करण्यास महात्मा गांधीचा विरोध होता अस्पृश्यांना हिंदूपासून वेगळे करण्याचा हा ब्रिटीशांचा डाव आहे. असे त्यांचे म्हणणे होते. अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाला मान्यता दिली तर ते कायमचे हिंदूपासून दूर जातील म्हणून जातीय निवाड्याच्या या तरतूदी विरोधात महात्मा गांधीनी पुणे येथील येरवडा तुरूंगामध्ये प्राणांतिक उपोषण सुरू केले. गांधीजींचे प्राण वाचावेत. म्हणून आंबेडकर तडजोडीला तयार झाले. त्यानुसार 25 सप्टेंबर 1932 रोजी पुणे करार गांधीजी व आंबेडकर यांच्यामध्ये झाला. या करारान्वये आंबेडकरांनी स्वतंत्र मतदार संघाच्या ऐवजी अस्पृश्यांना कायदेमंडळात राखीव जागा असाव्यात. असे मान्य केले. व गांधीजींचे प्राण वाचविले.

2. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना : 1936

1935 च्या भारत सुधारणा कायद्यान्वये 1937 मध्ये प्रांतिक निवडणुका होणार होत्या. त्या संधीचा लाभ घेऊन अस्पृश्यांना अधिक गतिमान करण्यासाठी 15 ऑगस्ट 1936 रोजी बाबासाहेबांनी 'स्वतंत्र मजूर पक्षाची' स्थापना केली. या पक्षाने 1937 च्या निवडणुकीत 13 जागा जिंकल्या बाबासाहेबांनी मुंबई परळ या राखीव जागेवर निवडून आले. स्वतंत्र मजूर पक्षाने 1937 ते 1942 या काळात गिरणी कामगारांना न्याय मिळवून देणे, खोती पद्धती व महार वतन नष्ट करणे, अस्पृश्यांना शिक्षणात सवलती, शेतकरी व कामगारांचे प्रश्न व. विरुद्ध आवाज उठविला.

| Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | 03 |

३. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना :-

अस्पृश्य व दलितांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी व न्याय मिळवून देण्यासाठी देश पातळीवर एक स्वतंत्र पक्ष असावा. या हेतूने रावबहादूर, एन शिवराज, सहकाऱ्यांच्या समवेत बाबासाहेबांनी "अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची" स्थापना १९४२ मध्ये केली. या पक्षाची ३. कलमी घटना बाबासाहेबांनी स्वतंत्र तयार केली. आंबेडकरांनी १९४२ ते १९४६ या काळात व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळात मजूर मंत्री म्हणून काम पाहिले. राजकारणात देखील त्यांनी आपल्या पददलित बांधवाच्या हिताचाच विचार केला. आणि त्यांच्या उन्नतीसाठी अविरत कष्ट घेतले.

आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य :-

बाबासाहेब स्वतः उच्च विद्याभूषित होते. त्यांच्याकडे भारतातील व इंग्लंड - अमेरिकेतील उच्च पदव्या होत्या. अस्पृश्यांना शिक्षण मिळाल्या खेरीज त्यांची उन्नती होऊ शकणार नाही, हे ओळखूनच बाबासाहेबांनी "शिका, संघटित व्हा व संघर्ष करा." हा संदेश दलितांना दिला होता. मुंबईतील सिडनेहॅम महाविद्यालयात ते काही काळ प्राध्यापक व काही दिवस प्राचार्य होते. १९२८ मध्ये त्यांनी All INDIA DEPRESSED CLASS EDUCATION SOCIETY स्थापना केली. व या सोसायटीच्या वतीने अस्पृश्य समाजातील मुलांसाठी दोन वसतीगृहे स्थापन करण्यात आली.

बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या 'बहिष्कृत हितकारिणी सभा" या संस्थेमार्फत दलित समाजातील तरुण व प्रौढ व्यक्तींसाठी रात्रशाळा, दानदिले, वाचनालये सुरू केले.

| 04 | Section | Q. No. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

या सारखे उपक्रम हाती घेण्यात आले होते. अस्पृश्यांना विशेष सवलती मिळाल्या शिवाय त्यांचा विकास होऊ शकणार नाही. हे जाणून बाबासाहेबांनी व्हॅाईसरॉयच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्य म्हणून काम करताना किंवा पुढील काळात घटना समितीमध्ये काम करताना अस्पृश्य वर्गांना आपल्या सर्वांगि प्रगतीसाठी आवश्यक त्या सवलती मिळतील अशी दक्षता घेतली.

* पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना

बाबासाहेबांच्या मते शिक्षणाचा मुख हेतू सामाजिक दर्जा उंचावणे हा आहे. समतेची प्रतिष्ठापना झाल्या शिवाय स्वातंत्र्याला अर्थ नाही. आणि समताधिष्ठीत समाजाच्या निर्मितीसाठी शिक्षणासारखे दुसरे साधन नाही. म्हणूनच दलित व बहुजनांच्या शिक्षणासाठी त्यांनी 8 जुलै 1945 रोजी "पीपल्स एज्युकेशन सोसायटीची" स्थापना मुंबई येथे केली. मुंबई देशभर विशेष मागासलेल्या वर्गात शिक्षणाचा प्रसार करणे ही हे या संस्थेचे ध्येय व उद्दिष्ट्ये आहे. या संस्थेच्या वतीने मुंबई येथे 20 जुन 1946 रोजी सिद्धार्थ कॉलेज सुरू केले. तसेच 19 जुन 1950 रोजी याच संस्था मार्फत PES कॉलेज औरंगाबाद येथे सुरू केले. इमारतीच्या पायाभरणीचा कार्यक्रम डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते पार पडला. पुढे 1955 मध्ये यांचे नामांतर मिलिंद कॉलेज आंबेडकरांनी आयुष्याच्या अखेरच्या काळात पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कार्याचा वाढवू घेतले. महाराष्ट्र, गुजरात, व कर्नाटक येथे या संस्थेच्या काही शाखा आहे.

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ॥
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.
(Empowered Autonomous)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | |
| Students Sign. : | |
| Seat No. : | |
| Seat No. in words : | |
| Suppliment No. : | |
| | 17260 |
| Centre | |

डॉ. आंबेडकरांची ग्रंथ संपदा व वृत्तपत्रे

आचार्य प्र. के. अत्रे असे म्हणतात की "वाचन, चिंतन आणि लेखन यावाचून आंबेडकरांना दुसरे जीवन नव्हते."

वर्तमानपत्रे हे जनमानसाचा कौल होणारे व जनमत घडवण्याचे परिवर्तनाचे साधन मानून बाबासाहेबांनी वर्तमानपत्रा द्वारे लोकजागृती घडवून आणण्याचे प्रयत्न केले. बहुजनसमाजाच्या अनुभवी त्यावर होणारे अन्याय, अत्याचार व उपरोक्त चळवळी मधील आपली भूमिका स्पष्ट करणे. सनातनी हिंदू सवर्णीयांच्या विरोधाला लेखणीच्या माध्यमातून प्रतिउत्तर देण्यासाठी आंबेडकरांनी वर्तमानपत्रे सुरू केली. व चालवली. त्यामध्ये मूकनायक [1920] बहिष्कृत भारत [1927] समता [1928] जनता [1930] व प्रबुद्ध भारत [1956] इ. वृत्तपत्रांचा उल्लेख करावा लागेल. जनता वृत्तपत्राचेच नाव प्रबुद्ध भारत असे ठेवण्यात आले.

वृत्तपत्राच्या लेखना बरोबरच बाबासाहेबांचे ग्रंथलेखनही तितकेच प्रशंसनीय व उल्लेखनीय आहे. बाबासाहेबांची विद्वत्ता त्यांची कोणत्याही विषयाचा अभ्यास हे त्यांच्या ग्रंथ लिखाणावरून आपणास दिसून येते. मराठी भाषिक प्रभुत्व असूनही ब्रिटिशांना भारतातील परिस्थितीचे ज्ञान व्हावे. यासाठी बाबासाहेबांनी सर्व ग्रंथ लिखाण इंग्रजीतच केले. ॲनायहिलेशन ऑफ कास्टस [1937] थॉटस ऑन पाकिस्तान [1940] अनटचेबल्स ऑर दी इंडियन कॉन्स्टिट्यूशन [1942] रानडे, गांधी ॲण्ड जीना [1943] ही

| Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | |

प्रॉब्लेम ऑफ दी रूपी [1946] हू वेअर द शुद्राज [1956] स्टेट ॲण्ड मायनॉरिटीज, बुध्द अँड हिज धम्म [1957] मरणोत्तर प्रकाशित) या ग्रंथ लेखनाद्वारे आपणास आंबेडकरांची विद्वत्ता, बिद्वत्ता, भाषेवरील प्रभुत्व व तत्कालिन भारताच्या कोणत्याही विषयावरील त्यांचा गाढा अभ्यास इ. गुण दिसून येतात.

* भारतीय घटनेचे शिल्पकार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशासाठी केलेली अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे, स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यात त्यांनी बजावलेली भुमिका होय. भारत स्वतंत्र झाल्यानंतर पंडीत नेहरू यांच्या मंत्रिमंडळात बाबासाहेब कायदा मंत्री झाले. यावेळी बाबासाहेबांची असामान्य बुध्दिमता आणि त्यांच्या कायद्याच्या सखोल अभ्यासाची नोंद घेवून त्यांना घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. बाबासाहेबांनी त्यांच्यावरील ह्या जबाबदारीचे यशस्वीरित्या वहन करित अतिशय परिश्रम पूर्वक भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार केला. घटनेत अनुसुचित जाती, जमातीचे हक्क, राखीव जागांचे तत्व व अस्पृश्यांना शैक्षणिक सवलती देण्याचे मान्य करण्यात आले.

भारताची राज्यघटना तयार करण्याच्या प्रक्रियेत त्यांनी सिंहाचा वाटा उचलला होता. म्हणूनच त्यांना "भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार" म्हणून गौरविले जाते.

भारतीय संविधानाच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अमेरिकेने त्यांना L.L.D ही कायद्यातील सर्वोच्च पदवी दिली.

स्वातंत्र्योत्तर काळात देशातील सर्व पददलित व कष्टकरी वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारा व पुरोगामी विचारांचा भारतीय रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याची त्यांची योजना होती.

| Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | | | | | 03 |

तथापी नव्या पक्षाच्या स्थापनेला मुर्त स्वरूप येण्यापुर्वीच त्यांचा अंत आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी महानिर्वाण झाले. पुढे त्यांच्या रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली.

मुल्यमापन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक अष्टपैलु व्यक्तिमत्व होते. त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, पत्रकारीता व कायदा अशा विविध क्षेत्रात आपल्या नेतृत्वाने दीन दलितांच्या शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रकाशाचा संदेश दिला. गलित गात्र झालेल्यांच्या मनामनातुन समाज क्रांतीचे स्फुल्लींग चेतवुन डॉ. आंबेडकरांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृती केले.

'बाबासाहेब आंबेडकर' हे नुसते पुस्तकी पंडीत नव्हते तर त्यांनी आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली; आणि आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली. त्यांनी भारतातील अस्पृश्य पददलित, स्त्रिया, शेतकरी व कामगार इ. च्या जीवनातील दुःख दारिद्र्य आणि दुर केले. व त्यांचा उध्दार केला.

धनंजय कीर आंबेडकरांविषयी म्हणतात की, "पददलित समाजाला मनुष्याच्या दर्जा मिळवून देणे, त्यांच्या आत्मसन्मानाची वाढ करणे आणि त्याला आत्मोध्दार करण्यास समर्थ करणे हे आंबेडकरांचे जीवितकार्य होते." थोडक्यात सांगावयाचे म्हणजे खरी माणसे बनविणे हे त्यांचे ध्येय होते.

बाबासाहेबांनी भारतातील दलित समाजाच्या उध्दारासाठी जे कार्य केले त्यास इतिहासात तोड नाही. आपल्या अस्पृश्य बांधवांना संघटीत करून त्यांना अन्याया विरूध्द संघर्ष करण्यास व न्याय हक्कासाठी झगडण्यासाठी त्यांनी तयार केले. तसेच दलितांना मुख्य राष्ट्रीय प्रवाहाशी जोडुन भारताची

| 04 | Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks | | | | | | | | | | | | |

प्र. क्र.
Q. No.

भारताची राज्यघटना तयार करून त्यांनी या देशाचीही फार मोठी सेवा केली.

बाबासाहेबांच्या या महान राष्ट्रसेवेप्रती कृतज्ञता म्हणून त्यांच्या जन्मशताब्दी महोत्सवांच्या प्रारंभाच्या वेळ साधून 14 एप्रिल 1990 रोजी त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला.

13

|| ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ||
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

(अधिकारप्रदत्त स्वायत्त)
कोल्हापूर

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.
(Empowered Autonomous)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | Mane |
| Students Sign. : | 7011 |
| Seat No. : | |
| Seat No. in words : | 13/15 |
| Suppliment No. : | |
| | 17212 |
| Centre | |

प्र. क्र.
Q. No.

Name- Pranali Prakash Powar.
Class- M.A-I. sem-II

विषय - H.S.R.M.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन व कार्याची सविस्तर माहिती लिहा.

| 02 Section | Q. No. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | |

प्र. क्र.
Q. No.

प्रस्तावना —

आधुनिक महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या चळवळीमध्ये सत्यशोधक व ब्राम्हणेतर चळवळी प्रमाणेच दलित चळवळीला महत्वाचे स्थान आहे. हिंदू समाजाने बहिष्कृत आणि तिरस्कृत ठेवलेल्या जातींना दलित म्हटले जाते. दलित हा शब्द सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करतो. थोडक्यात, समाजातील दुर्बल व अन्याय- अत्याचार याचे बळी ठरलेल्या घटकांना उद्देशून दलित असा शब्द प्रयोग केला जातो. दलितांमध्ये स्वाभिमान, आत्मविश्वास निर्माण करून त्यांना संघटित करण्याचे व न्याय हक्कांसाठी त्यांना संघर्ष करण्यास तयार करण्याचे कार्य दलित चळवळीने केले. दलित चळवळ ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्वीच्या काळात सुरु झाली असली तरी तिला चळवळीचे स्वरूप खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना अत्याचार व गुलामगिरीतुन मुक्त करण्याबरोबरच भारतीय घटनेनुसार त्यांना आर्थिक विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे अलौकीक कार्य केले. म्हणूनच भारतीय घटनेचे शिल्पकार व कोट्यावधी दलितांच्या जीवनाचे उध्दारक म्हणून त्यांचे कार्य वेगळे व असामान्य आहे.

जन्म व पुर्व वृत्तांत —

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेश मधील 'महू' येथे एका गरीब दलित कुटुंबात झाला होता. त्यांचे पुर्ण नाव

| Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | 03 |

भीमराव रामजी आंबेडकर असे होते. रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबवडे हे त्यांचे मूळ गाव. वडील 'रामजी' सैन्यात सुभेदार असल्याने शिक्षण व शिस्त लहानपणापासून त्यांच्या अंगी बाणली होती. त्यांची आई भीमाबाई लहानपणीच वारल्याने त्यांच्या वडीलांनी त्यांचे पालन पोषण केले व चांगले संस्कार त्यांच्यावर व्हावेत म्हणून ते दक्ष असत. त्यांना स्वतः वाचनाची आवड असल्यामुळे घरात ग्रंथ संग्रह होताच.

शिक्षण –

बाबासाहेबांचे वडील रामजी आंबेडकर सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर त्यांना सातारा येथे दुसरी सरकारी नोकरी मिळाली. त्यामुळे बाबासाहेबांचे बालपण सातारा येथेच गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण सातारा व मुंबई या ठिकाणी झाले. १९०७ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा पास झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांनी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेज मध्ये प्रवेश घेतला व १९१२ मध्ये ते इंग्रजी व पर्शियन विषय घेवून बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. बालविवाहाची प्रथा त्याकाळी रूढ असल्यामुळे वयाच्या १४व्या वर्षी त्यांचा विवाह रमाबाई नावाच्या मुलीबरोबर झाला. परंतु शिक्षणाविषयी आवड असल्यामुळे विवाहानंतरही त्यांनी आपले शिक्षण सुरूच ठेवले. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने शिक्षणक्रम चालू ठेवणे आंबेडकरांना कठीण होऊ लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बडोद्याचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड यांनी अमेरिकेतील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर केल्यामुळे कोलंबिया विद्यापीठात अर्थशास्त्र विषयात एम.ए.ची पदवी १९१५ साली त्यांनी संपादन केली. १९१६ मध्ये कोलंबिया विद्यापीठातच पीएच.डी.

साठी त्यांनी ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेचा विकास' या विषयावर प्रबंध लिहिला.. अमेरिकेतील अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर बाबासाहेब आंबेडकर कायदा व अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी इंग्लंडला गेले. परंतु आर्थिक अडचणीमुळे त्यांना ते शिक्षण अर्धवट सोडावे लागले. भारतात परत आल्यानंतर बडोदा संस्थानामध्ये त्यांनी काही काळ नोकरी केली. परंतु नोकरीमध्ये इतरांनकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्यामुळे ती नोकरी सोडून परत मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काही काळ त्यांनी काम केले. राजर्षी छ. शाहू महाराजांनी केलेल्या आर्थिक मदतीमुळे आंबेडकर पुन्हा इंग्लंडला गेले व एम. एस्सी (अर्थशास्त्र) व डी. एस्सी. ह्या पदव्या त्यांनी मिळविल्या.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य

आंबेडकरांना बालपणापासून शिक्षण घेताना सार्वजनिक ठिकाणी व बडोदा संस्थानामध्ये नोकरी करीत असताना पदोपदी अपमानास्पद वागणूक मिळाली त्यामुळे भारतातील सामाजिक विषमतेबद्दल आंबेडकरांना चीड निर्माण झाली होती. शाहू महाराजांनी दिलेल्या आर्थिक मदतीच्या साहाय्याने बाबासाहेबांनी १९२० मध्ये मूकनायक हे पाक्षिक सुरू केले व सामाजिक विषमतेवर प्रखर टीका केली.

माणगाव अस्पृश्यता निवारण परिषद

नागपूर व कोल्हापुरातील माणगाव येथे आयोजित अस्पृश्यता निवारण परिषदांमध्ये आंबेडकर

|| ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ||

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

(अधिकारप्रदत्त स्वायत्त)
कोल्हापूर

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.

(Empowered Autonomous)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | |
| Students Sign. : | |
| Seat No. : | |
| Seat No. in words : | |
| Suppliment No. : | |
| 17213 | |
| Centre | |

प्र.
No.

सहभागी झाले होते. २२ मार्च १९२० रोजी माणगाव येथील परिषदेमध्ये राजर्षी शाहू महाराजांनी आंबेडकर-विषयी गौरवोद्गार काढताना म्हटले की, "माझ्या राज्यातील बहिष्कृत प्रजाजनांनो, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला याबद्दल मी तुमचे अंत:करणपूर्वक अभिनंदन करतो.

बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना (१९२४)

इंग्लंडमधून भारतात परतल्यावर बाबासाहेबांनी पुन्हा एकदा आपल्या सार्वजनिक कार्याला नव्या जोमाने सुरुवात केली. अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करून त्यांना अस्पृश्यतेच्या प्रथेविरुद्ध संघर्ष करण्यास प्रवृत्त करण्यासाठी २० जुलै, १९२४ रोजी बाबासाहेबांनी "बहिष्कृत हितकारिणी सभेची" स्थापना केली.

महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह –

बाबासाहेबांची १९२७ मध्ये मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाचे सदस्य म्हणून नियुक्ती झाली. सरकारने १९२६ मध्ये कायदा करून सार्वजनिक पाणवठ्यांच्या जागा सर्वांसाठी खुल्या केल्या. परंतु याची प्रत्यक्षात

| 02 | Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks | | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

अंमलबजावणी झाली नव्हती. महाड येथील चवदार तळ्याचे पाणी भरण्यास अस्पृश्यांना मज्जाव केला होता. यामुळे आंबेडकरांनी 20 मार्च, 1927 रोजी हजारो अनुयायांसह चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले.

मनुस्मृतीचे दहन –

महाड येथे भरलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या सत्याग्रह परिषदेत, सनातनी हिंदू समाजाचा धर्मग्रंथ असलेल्या मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय घेतला होता. मनुस्मृतीने जन्माधिष्ठित वर्णव्यवस्थेचे समर्थन करून सामाजिक विषमतेला न्यायावर आधारित जातिव्यवस्थेला आधार प्राप्त करून दिला होता.

राजकीय कार्य –

अस्पृश्यांना राजकीय दृष्ट्या संघटित करण्यात आलेल्यांना राजकारणात स्वतःचा आवाज प्राप्त करून देण्यात आंबेडकरांनी सिंहाचा वाटा उचलला होता. परंतु बाबासाहेबांना केवळ अस्पृश्यांचे नेते समजणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणारे आणि आपल्या अज्ञानाचे प्रदर्शन ठरेल. राजकीय क्षेत्रात त्यांनी देशासाठी केलेले कार्य खूपच महत्त्वाचे आहे. त्यांचे राजकीय विचार देशाच्या दृष्टीने आजही उपयुक्त आहेत.

पुणे करार –

अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची

| Q. No. | | | | | | | | | | | | | 03 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | | | | | | |

निर्मिती करण्यास महात्मा गांधींचा विरोध होता. अस्पृश्यांना हिंदू पासून वेगळे करण्यास हा ब्रिटिशांचा डाव आहे असे त्यांचे म्हणणे होते. अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाला मान्यता दिली तर ते उर्वरित हिंदू समाजापासून दूर जातील म्हणून जातीय निवाड्या-च्या या तरतुदी विरोधात महात्मा गांधींनी पुणे येथील येरवडा तुरुंगामध्ये प्रामाणिक उपोषण सुरु केले. गांधीजींचे प्राण वाचावेत म्हणून आंबेडकर तडजोडीला तयार झाले. त्यानुसार २५ सप्टेंबर १९३२ रोजी पुणे करार गांधीजी व आंबेडकर यांच्यामध्ये झाला.

स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना - १९३६

१९३५ च्या भारत सुधारणा कायद्यान्वये १९३७ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार होत्या. त्या संधीचा लाभ घेवून अस्पृश्यांचा लढा अधिक गतीमान करण्यासाठी १६ ऑगस्ट १९३६ रोजी बाबासाहेबांनी "स्वतंत्र मजूर पक्ष" स्थापन केली. या पक्षाने १९३७ च्या निवडणुकीत १३ जागा जिंकल्या. बाबासाहेब भायखळा परळ या राखीव जागेवर निवडून आले.

भारतीय घटनेचे शिल्पकार -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशासाठी केलेली अत्यंत महत्वपूर्ण कामगिरी म्हणजे, स्वतंत्र भारता-ची राज्यघटना तयार करण्यात त्यांनी बजावलेली भूमिका होय. भारत स्वतंत्र झाल्यानंतर पंडीत नेहरु यांच्या मंत्रिमंडळात बाबासाहेब कायदामंत्री झाले. या वेळी

| 04 Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

बाबासाहेबांची असामान्य बुद्धिमत्ता आणि त्यांच्या कायद्यांच्या सखोल अभ्यासाची नोंद घेवून त्यांना घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले.

भारताची राज्यघटना तयार करण्याच्या प्रक्रियेत त्यांनी सिंहाचा वाटा उचलला होता. म्हणूनच त्यांना "भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार" म्हणून गौरविले जाते. भारतीय संविधानाच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अमेरिकेने त्यांना L.L.D ही कायद्यातील सर्वोच्च पदवी दिली.

स्वातंत्र्योत्तर काळात देशातील सर्व पददलित व कष्टकरी वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारा व पुरोगामी विचारांचा भारतीय रिपब्लिकन पक्ष स्थापना करण्याची त्यांची योजना होती. तथापि नव्या पक्षाच्या स्थापने-च्या योजनेला मुर्त स्वरूप येण्यापूर्वीच त्यांचा अंत झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी महानिर्वाण झाले पुढे त्यांच्या अनुयायांनी "रिपब्लिकन पक्षाची" स्थापना केली.

मूल्यमापन =

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, पत्रकारिता न कायदा अशा विविध क्षेत्रात आपल्या नेतृत्वाने दीन दलितांच्या शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रकाशाचा संदेश दिला.

13

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ॥

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.

(Empowered Autonomous)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | Bhone |
| Students Sign. : | |
| Seat No. : | 7012 |
| Seat No. in words : | |
| Suppliment No. : | |
| | 4156 |
| Centre | |

10/15

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्याची माहिती थोडक्यात स्पष्ट करा.

→ आधुनिक महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या चळवळीमध्ये सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळी प्रमाणेच दलित चळवळीला महत्त्वाचे स्थान आहे. हिंदू समाजाने बहिष्कृत आणि तिरस्कृत ठेवलेल्या जातींना दलित म्हटले जाते. दलित हा शब्द सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या समाजाचे प्रतिनिधीत्व करतो. दलितांमध्ये स्वाभिमान, आत्मविश्वास, निर्माण करून त्यांना संघटित करण्याचे व न्याय हक्कासाठी त्यांना संघर्ष करण्यास तयार करण्याचे कार्य दलित चळवळीने केले. दलित चळवळ ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्वीच्या काळात सुरू झाली असली तरी, तिला चळवळीचे स्वरूप खऱ्या अर्थाने डॉ. आंबेडकरांनी दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना अत्याचार व गुलामगिरीतून मुक्त करण्याबरोबरच भारतीय घटनेनुसार त्यांना आर्थिक विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे अलौकिक कार्य केले. म्हणूनच भारतीय घटनेचे शिल्पकार व कायद्यातज्ञ दलितांच्या जीवनाचे उद्धारक म्हणून त्यांचे कार्य विशाल व असामान्य आहे.

* जन्म व शिक्षण :

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेश मधील 'महू' येथे एका गरीब दलित कुटुंबात झाला होता.

| Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | |

त्यांचे पुर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर असे होते.
रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबवडे हे त्यांचे मुळ गाव.

- वडील 'रामजी' सैन्यात सुभेदार असल्याने शिक्षण व शिस्त लहानपणापासुन त्यांच्या अंगी बाणली होती.
- त्यांची आई भीमाबाई लहानपणी वारल्यानेच त्यांच्या वडीलांनी त्यांचे पालन पोषण केले व त्यांच्यावर चांगले संस्कार कीवत म्हणुन ते दक्ष असत.
- त्यांना वाचनाची आवड असल्यामुळे घरात ग्रंथ संग्रह होताच मुलांनाही ते चांगली पुस्तके आणुन देत असत.
- म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याची अंतीम क्षणांपर्यंत वाचनाचीव अभ्यासपुर्ण चिंतनाची सवय त्यांच्या ठायी आढळते.
- बाबासाहेबांचे वडील रामजी आंबेडकर सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर त्यांना सातारा येथे दुसरी सरकारी नोकरी मिळाली.
- म्हणून बाबासाहेबांचे बालपण सातारा येथे गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण सातारा व मुंबई या ठिकाणी झाले.
- १९०७ मध्ये मॅट्रीक परिक्षा पास झाले. पुढील शिक्षणासाठी मुंबई च्या एल्फिन्स्टन कॉलेज मध्ये प्रवेश घेतला
- १९१२ मध्ये ते इंग्रजी व पर्शियन विषय घेवुन बी.ए. ची परिक्षा उत्तीर्ण झाले
- यानंतर परदेशी शिक्षणासाठी त्यांना महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या तर्फे शिष्यवृत्ती दिली गेली
- त्यांनी अर्थशास्त्र विषयात एम.ए.ची पदवी १९१५ साली संपादन केली.
- १९१६ मध्ये कोलंबिया विद्यापीठातच प्रोफे. डॉ. सेलीग्मन यांनी 'ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेचा विकास' या विषयावर प्रबंध लिहला.
- १९२३ मध्ये बॅरिस्टरची परीक्षा पास होवुन ते भारतात परतले.

| Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | 03 |

प्र. क्र. / Q. No.

* **सामाजिक कार्य** :-

- आंबेडकरांना बालपणापासून शिक्षण घेताना सार्वजनिक ठिकाणी व बडोदा संस्थानामध्ये नोकरी करत असताना पदोपदी अपमानास्पद वागणूक मिळाली.
- त्यामुळे भारतातील सामाजिक विषमतेबद्दल आंबेडकरांना चीड निर्माण झाली होती.
- आंबेडकरांच्या मते, "ज्या प्रमाणे कोणत्याही राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याचा अधिकार नाही, त्याचप्रमाणे कोणत्याही एका विशिष्ट वर्गाला दुसऱ्या वर्गावर अधिसत्ता गाजविण्याचा अधिकार नाही."
- म्हणूनच आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात करताना त्यांनी अस्पृश्यांना त्यांचे नैसर्गिक हक्क व न्याय मिळवून देण्याच्या कार्याला प्रारंभ केला.
- दलित मुक्ती चळवळीद्वारे बहुजनांमध्ये अस्मिता, स्वत्व, सामाजिक विषमतेबद्दलची चीड निर्माण करण्याचे काम आंबेडकरांनी केले.
- शाहू महाराजांनी दिलेल्या आर्थिक मदतीच्या साहाय्याने बाबासाहेबांनी १९२० मध्ये मूकनायक हे पाक्षिक सुरू केले व सामाजिक विषमतेवर प्रखर टिका केली.

* **माणगांव अस्पृश्यता निवारण परिषद** :-

- नागपूर व माणगाव येथे आयोजित अस्पृश्यता निवारण परिषदांमध्ये आंबेडकर सहभागी झाले होते.
- २२ मार्च १९२० रोजी माणगाव येथील परिषदेमध्ये शवटी शाहू महाराजांनी आंबेडकरांविषयी गौरवोद्गार काढताना म्हटले की "माझ्या राज्यातील बहिष्कृत प्रजाजनांनो, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला याबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो.
- माझी खात्री आहे की, डॉ. आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत."
- शाहू महाराजांची भविष्यवाणी ही तंतोतंत खरी ठरली.

| 04 Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

* महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह :-

- सरकारने १९२३ मध्ये कायदा करून सार्वजनिक पाणवठ्यांच्या जागा सर्वांसाठी खुल्या केल्या.
- परंतु याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नाही.
- महाड येथील चवदार तळ्याचे पाणी भरण्यास अस्पृश्यांना मज्जाव केला होता.
- म्हणून बाबासाहेबांनी स्वतः चवदार तळ्यावर जाऊन पाणी पिण्याचे ठरले. त्यानुसार 20 मार्च, १९२७ रोजी हजारो अनुयायांसह चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले.

* मनुस्मृतीचे दहन :-

- महाड येथे भरलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या सत्याग्रह परिषदेत, सनातनी हिंदू समाजाच्या धर्मग्रंथ असलेल्या मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय घेतला होता.
- मनुस्मृतीने जन्माधिष्ठित वर्ण व्यवस्थेचे समर्थन करून सामाजिक विषमतेला व त्यावर आधारित जातिव्यवस्थेला आधार प्राप्त करून दिला होता.
- याचा निषेध करण्यासाठी बाबासाहेबांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे जाहिररित्या दहन केले.

* भारतीय घटनेचे शिल्पकार :-

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशासाठी केलेली अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे, स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यात त्यांनी बजावलेली भूमिका होय.

10

- त्यांनी त्यांचे संपूर्ण जीवन मानवमुक्तीच्या कार्याला वाहून नेले व आपले सर्व या देशाला अर्पण केले.
- त्यांच्या या महान कार्यामुळे त्यांना १४ एप्रिल १९९० रोजी मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला.

नाव - कु. मधुरा मुरलीधर खोत

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ॥

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

(अभिमतविद्यापीठ प्रायोजक)
कोल्हापूर

**VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.**
**(Empowered Autonomous)**

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | [signature] |
| Students Sign. : | |
| Seat No. : | 7016 |
| Seat No. in words : | |
| Suppliment No. : | |
| | 4801 |
| Centre | |

12/15

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य थोडक्यात स्पष्ट करा.

→ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य याविषयी थोडक्यात स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे.

डॉ. आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी मध्य प्रदेश मध्ये 'महू' येथे एका गरीब दलित कुटुंबात झाला होता.

त्यांचे पूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर असे होते.

रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबवडे हे त्यांचे मुळ गाव.

वडील 'रामजी' सैन्यात सुभेदार असल्याने शिक्षण व शिस्त लहानपणापासूनच त्यांच्या अंगी बाणली होती.

| Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | |

त्यांची आई भीमाबाई लहानपणीच वारल्याने त्याच्या वडीलांनी त्यांचे पालन पोषण केले.

व चांगले संस्कार त्यांच्यावर व्हावेत म्हणून ते दक्ष असात. त्यांना स्वत वाचनाची आवड असल्यामुळे घरात ग्रंथ संग्रह होताच.

त्यांना स्वत वाचनाची आवड असल्यामुळे घरात मुलांनाही ते चांगली पुस्तके वाचावयास आणून देत असत.

म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणापावेतो वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्यांच्या ठायी आढळते.

शिक्षण.

बाबासाहेबांचे वडील रामजी आंबेडकर सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर त्यांना सातारा येथे दुसरी सरकारी नोकरी मिळाली यामुळे बाबासाहेबांचे बालपण सातारा येथेच गेले.

त्यांचे प्राथमिक शिक्षण सातारा व मुंबई या ठिकाणी झाले. १९०७ मध्ये ते मॅट्रिक ची परीक्षा पास झाले.

सयाजी व शाहू महाराजांनी केलेल्या आर्थिक मदतीमुळे आंबेडकर पुन्हा इंग्लंडला गेले.

व एम. एस्सी (अर्थशास्त्र) व डी. एस्सी ह्या पदव्या त्यांनी मिळविल्या.

03

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य पुढील प्रमाणे -

आंबेडकरांना बालपणापासून शिक्षण घेताना सार्वजनिक ठिकाणी व बुद्धीद्य स्थळामध्ये नोकरी करीत असताना पदोपदी अपमान सहन करावा लागला.

म्हणून त्यांनी लढण्याचे ठरवले. बहुजनांमध्ये आत्मभान, स्वत्व, सामाजिक शिक्षण इत्यादी निर्माण करण्याचे काम आंबेडकरांनी केले.

(1) माणगाव अस्पृश्यता निवारण परिषद -

कोल्हापूर संस्थानातील माणगाव येथे भरलेल्या अस्पृश्यता निवारण परिषदेमध्ये आंबेडकर सहभागी झाले होते. २२ मार्च १९२० रोजी माणगाव येथील परिषदेमध्ये शाहू महाराजांनी गौरवोद्गार काढले.

(2) बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना (१९२४)

इंग्लंडमधून भारतात परतल्यावर डॉ. बाबासाहेबांनी पुन्हा एकदा आपल्या सामाजिक कामाला नव्या जोमाने सुरुवात केली.

अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करून त्यांना अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी तयार करण्यासाठी २० जुलै १९२४ रोजी बाबासाहेबांनी "बहिष्कृत हितकारिणी सभेची" स्थापना केली. ग्रंथालये व वसतिगृहे सुरू करण्याचे काम या सभेने केले.

04 Section | Q. No. | Marks

प्र. क्र. Q. No.

③ महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह.
बाबासाहेबांची १९२६ मध्ये मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाचे सदस्य म्हणून नियुक्ती झाली.
सरकारने १९२८ मध्ये कायदा करून सार्वजनिक पाणवठ्याच्या जागा सर्वांसाठी खुल्या केल्या.

④ मनुस्मृतीचे दहन.
महाड येथे भरलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या सत्याग्रह परिषदेत, त्यांनी हिंदू समाजाचा धर्मग्रंथ असलेल्या मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय घेतला होता. मनुस्मृतीने जन्माधिष्ठित वर्ण व्यवस्थेचे समर्थन करून

⑤ मंदिर प्रवेशाची चळवळ
हिंदू धर्मातील उच्चवर्णीयांनी अस्पृश्यांना मंदिर प्रवेशाचा हक्क मान्य झालाच पाहिजे. परंतु मंदिर प्रवेशाचा निर्णय तडीस लावला नाही. डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहातून अस्पृश्यांची अस्मिता जागी करण्याचा प्रयत्न केला.

⑥ बौद्ध धर्माचा स्वीकार.
हिंदू समाजातील सामाजिक विषमता नष्ट व्हावी व अस्पृश्यांना आपले समान अधिकार प्राप्त व्हावेत तसेच टाकवलेल्या अस्पृश्यांना न्याय मिळावा या साठी बाबासाहेबांनी प्रयत्न केले

|| ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ||
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

(श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था)
कोल्हापूर

VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR.
(Empowered Autonomous)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Jr. Supervisor's Sign. : | |
| Students Sign. : | |
| Seat No. : | |
| Seat No. in words : | |
| Suppliment No. : | |
| | 4803 |
| Centre | |

प्र. क्र.
Q. No.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'राजकीय' कार्य पुढीलप्रमाणे.

अस्पृश्यांना राजकीय दृष्ट्या संघटित करण्यात आणि त्यांना राजकारणात स्व. त्यांचा आवाज प्राप्त करून देण्यात आंबेडकरांचा सिंहाचा वाटा होता.

① पुणे करार -
अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची निर्मिती करण्यास महात्मा गांधींचा विरोध होता अस्पृश्यांना हिंदू पासून वेगळे करण्याचा ब्रिटिशांचा डाव आहे असे त्यांचे म्हणणे होते.

② स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना १९३६
१९३५ च्या भारत सुधारणा कायद्यान्वये १९३७ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार होत्या. त्या संधीचा लाभ घेऊन अस्पृश्यांचा लढा अधिक गतिमान करण्यासाठी १६ ऑगस्ट १९३६ रोजी बाबासाहेबांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला. या पक्षाने १९३७ च्या निवडणुकीत १३ जागा जिंकल्या.

| 02 | Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks | | | | | | | | | | | | |

प्र. क्र. Q. No.

③ शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना -
अस्पृश्य व दलितांचे हितांचे रक्षण करण्यासाठी व न्याय मिळवून देण्यासाठी देश पातळीवर एक स्वातंत्र्य पक्ष असावा या हेतुने रावबहादूर, एन. शिवराज यांनी तयार घटना केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'शैक्षणिक' कार्य पुढीलप्रमाणे.
बाबासाहेब स्व. त उच्च विद्याविभूषित होते. त्यांच्याकडे भारतातील व इंग्लंड-अमेरिकेतील उच्च पदव्या होत्या.
पुढील काळात घटना समितीमध्ये काम करताना अस्पृश्य वर्गाला आपल्या सर्वांगीण प्रगतीसाठी
① पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना.
बाबासाहेबांच्या मते शिक्षणाचा मूळ हेतू सामाजिक दर्जा उंचावणे हा आहे. समतेची प्रतिष्ठापना झाल्याशिवाय स्वातंत्र्याला अर्थ नाही आणि सुसाधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी शिक्षणासारखे दुसरे साधन नाही.
② ग्रंथसंपदा व वृत्तपत्रे.
वर्तमानपत्रे हे जनमानसाचा कौल घेणारे व जनमत घडवण्याचे प्रभावी साधन मानून बाबासाहेबांनी वर्तमानपत्राद्वारे लोकजागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला.
कोणत्याही विषयावरील त्यांचा गाढा अभ्यास हा गुण दिसून येतात.

| Section | Q. No. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | | | | | | | | | | | 03 |

प्र. क्र. / Q. No.

③ भारतीय घटनेचे शिल्पकार -

स्वातंत्र्य भारताची राज्यघटना तयार करण्यात त्यांनी बजावलेली भूमिका मोठी आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पं. नेहरू यांच्या मंत्रिमंडळात बाबासाहेब कायदामंत्री होते.

वरीलप्रमाणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य याविषयी थोडक्यात माहिती होती.

VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (EMPOWERED AUTONOMOUS)

CONTINUOUS INTERNAL EXAMINATION

Subject - History

Class: M.A I   Semester: II

Paper Title: History of Social Reformers in Maharashtra

Paper No: VII

Subject Code: 2 DSC08HIS23

| | |
|---|---|
| Date: | 25/2/2025. |
| Total Marks: | 15 |
| Type of Test: | Surprise Test. |
| Module: | 3 |

**Mark List of Students**

| Sr. No. | Roll No | Marks | Sr. No. | Roll No | Marks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 7003 | 14 | 11 | 7010 | 08 |
| 2 | 7021 | 07 | 12. | 7011 | 13 |
| 3 | 121832 | 11. | 13 | 7012 | 10 |
| 4 | 121833 | 9 | 14. | 7014 | 12 |
| 5 | 121834 | 8 | | | |
| 6 | 7004 | 9. | | | |
| 7 | 7006 | 12. | | | |
| 8 | 7007 | 11 | | | |
| 9 | 7008 | 12 | | | |
| 10 | 7009 | 13 | | | |

Dr. S.R. Kattimani

HEAD
DEPARTMENT OF HISTORY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)